सत्य बातम्यांसाठी प्रकाशित एकमेव दैनिक

# लोकटाइम्स

▶ पुणे,बुधवार, दि. १५ मे २०२४ संपूर्ण महाराष्ट्रात वितरण...

▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १३३ ▶ किंमत : ३ रु ▶ पाने : ८ ▶ पुणे :▶ Reg.No. SDM/PUNE/SR/48/2016 ▶ R.N.I. No. MAHMAR/2003/14034

## विमान प्रवासात चोऱ्या करणारा गजाआड; २०० पेक्षा जास्त चोऱ्या केल्याचे उघड!

एअर इंडियाच्या फ्लाइटमध्ये सतत चोरी होत असल्याचं समोर आल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. यूएसला जाणाऱ्या दोन प्रवाशांचे दागिने लंपास झाल्यानंतर हा प्रकार उजेडात आला. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पोलीस पथकाने सोमवारी एका दागिने चोराला अटक केली. हा चोर २००५ पासून चोरीच्या घटनांमध्ये सामील होता. पूर्वी तो ट्रेनमध्ये चोरी करायचा. परंतु नतंर त्याने विमानात सहप्रवाशांच्या सामानाची चोरी करायला सुरुवात केली. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय राजेश कपूर बोर्डिंग प्रक्रियेदरम्यान हँडबॅग घेऊन जाणाऱ्या वृद्ध महिला प्रवाशांना लक्ष्य करत असे. त्याचा मृत भाऊ ऋषी कपूर याची ओळख घेऊन तो प्रवास करायचा. तसंच, सावज हेरण्यासाठी तो सतत जागाही बदलत राहायचा.

लोकटाइम्स
ताज्या बातम्या व अधिक माहितीसाठी आणि व्हिडीओसाठी
पहा आमची वेबसाईट
www.eloktimes.com

# मोदींनी वाराणसीतून दाखल केला उमेदवारी अर्ज

## गंगा पूजन आणि कालभैरवाचा आशीर्वाद घेत झाले भावूक



**वाराणसी , प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीच्या एकूण सात टप्प्यांपैकी चौथ्या टप्प्यातील मतदान १३ मे रोजी पार पडले आहे. आता पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वाराणसी लोकसभा मतदारसंघामधून निवडणूक लढवत आहेत. आज नरेंद्र मोदी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. पंतप्रधान मोदी हे वाराणसीमधून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. त्यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्याआधी गंगेचे पूजन केले आणि कालभैरवाचा आशीर्वाद घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वाराणसीमधून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे त्यांनी निवडणुकीचा अर्ज दाखल करण्याआधी गंगा पूजन करत वाराणसीबरोबरचे गेल्या १० वर्षांचे ऋणानुबंध आठवत शेअर केले. पंतप्रधान मोदी यावेळी काहीसे भावूक झाले होते. मोदींनी यावेळी भावना व्यक्त करताना आई गंगा मातेने मला दत्तक घेतले असल्याची प्रतिक्रिया दिली. काशीशी असलेले ऋणानुबंध सांगतानाही मोदी भावूक झाले. तसेच लोकांचे माझ्यावरील प्रेम पाहून माझ्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस आणखी वाढत असल्याचंही त्यांनी म्हटलं.

### दिग्गज नेत्यांची उपस्थिती

पंतप्रधान मोदींनी अर्ज दाखल केला, यावेळी वाराणसीमध्ये एनडीएमधील दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासह आदी भाजपाचे नेतेही उपस्थित होते. दरम्यान, देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरू आहे. सर्वच रजकीय पक्षांच्या नेत्यांकडून सभा, मेळाव्यांचा धडाका सुरू आहे. या लोकसभेच्या निवडणुकीत देशात प्रामुख्याने भारतीय जनता पार्टी विरूद्ध इंडिया आघाडी अशी लढत होत असल्याचे दिसत आहे. भाजपाने या निवडणुकीमध्ये ४०० पारचा नारा दिलेला आहे. याचा उल्लेखही अनेकदा पंतप्रधानांनी भाषणात केला. इंडिया आघाडीच्यावतीने देशात आघाडीचे सरकार येईल, असा दावा केला जात आहे. त्यामुळे या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये चुरस पाहायला मिळत आहे. असे असले तरी ४ जूनच्या निकालाकडे देशवाशीयांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### कारागृह रक्षकांच्या १८०० जागांसाठी पावणेचार लाख अर्ज

**नागपूर :** राज्याच्या गृहमंत्रालयाकडून कारागृह रक्षकांची लवकरच भरती केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर ही प्रक्रिया सुरू होणार असताना अवघ्या १८०० जागांसाठी तब्बल पावणेचार लाख अर्ज आले आहेत. पोलीस दलातील अन्य पदांसाठीही लाखोंच्या संख्येने अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यात कारागृह रक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्यातील जवळपास सर्वच कारागृहातील सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर आहे. ही बाब लक्षात घेऊन गृहमंत्रालयाने भरती प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. राज्यभरात १८०० रिक्त जागांसाठी ३ लाख ७२ हजार ३५४ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती अप्पर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांनी दिली. मैदानी चाचणी आणि लेखी परीक्षेनंतर उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याखेरीज गृहमंत्रालयाने राज्य पोलीस दलातील शिपाई, चालक, बँड्समन, राज्य राखीव पोलीस दलातील जवानांची रिक्त पदे भरण्यासही मंजुरी दिली आहे. या १७ हजार ४७१ पदांसाठी तब्बल १७ लाख ७६ हजार अर्ज आले आहेत. यात पोलीस शिपायांच्या ९ हजार ५९५ रिक्त पदांसाठी सर्वाधिक ८ लाख २२ हजार ९८४ अर्ज आले. वाहनचालकाच्या १,६८६ जागांसाठी १ लाख ९८ हजार ३०० युवक-युवतींनी अर्ज केले आहेत.

# पुढील ३ दिवस राज्यात वादळी पाऊस; कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा



**पुणे, प्रतिनिधी :** कडाक्याच्या उन्हानंतर गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यात मुसळधार वादळी पाऊस झाला. दरम्यान पुढील तीन दिवसही महाराष्ट्रातील बहुतांशी भागात तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. तर कोकणात मात्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पाऊस

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वाऱ्यासह (४०-५० किमी प्रतितास वेग) हलका ते माध्यम पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळ पाऊस आणि गारपीटीचा अंदाज वर्तवला आहे. तर कोकणातील तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट (थशरींहशी ीशलरींी) येण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने एक्स पोस्ट करत दिली आहे.

यंदा मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, आग्नेय बंगालच्या उपसागराच्या काही भागात आणि निकोबार बेटांवर १९ मे रोजी दाखल होण्याची शक्यता.

**मुंबई शहर आणि उपनगरांत पुढील २४ तासात वादळी पावसाचे**

मुंबई शहर आणि उपनगरांसाठी पुढील २४ तासात वादळी पावसासह उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. दुपार/संध्याकाळपर्यंत गडगडाटी वादळासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असून, कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे 37AmoC आणि 26AmoC च्या आसपास राहील, असेही हवामान विभागाने म्हटले आहे.

# शिक्षक, पदवीधर विधान परिषद निवडणूक पुढे ढकलली



**नवी दिल्ली प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळीतच जाहीर करण्यात आलेली विधान परिषद निवडणुकीबाबत महत्वाची माहिती आली आहे. शिक्षक, पदवीधरच्या चार मतदारसंघांसाठी जाहीर केलेली निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर, तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. या चार जागांसाठी येत्या १० जून रोजी मतदान होणार होते, तर १३ जूनला मतमोजणी केली जाणार होती.

शाळांमधील उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर ही निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने या संदर्भात विचारविमर्श करून महाराष्ट्र विधान परिषदेच्या उक्त द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम नंतरच्या तारखेपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबरचे परिपत्रकही जाहीर करण्यात आले आहे.

विधानपरिषदेत मुंबई पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे उद्धवसेनेचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे निरंजन डावखरे, मुंबई शिक्षकचे कपिल पाटील व नाशिक शिक्षकचे किशोर दराडे यांची सदस्यत्वाची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा महायुती आणि महाविकास आघाडी आमने-सामने येणार आहेत.

# लाच प्रकरणी फरार उत्पादन शुल्क अधीक्षक संजय पाटील यांना पाचगणीत बेड्या



**कोल्हापूर, प्रतिनिधी :** बीअर शॉपीचा परवाना मंजूर करण्यासाठी एक लाखाच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या चंद्रपूर येथील राज्य उत्पादन शुल्कचे फरार अधीक्षक संजय जयसिंगराव पाटील (वय ५४, रा. आर.के. नगर, कोल्हापूर, मूळ रा. शिरदवाड, ता. शिरोळ) यांना चंद्रपूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे अटक केले.

चंद्रपूर शहर पोलिसांनी संजय पाटील यांना चंद्रपूर येथील न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी बजावली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या पोलिस उपअधीक्षक मंजुषा भोसले संजय पाटील यांच्याकडे सखोल चौकशी करीत आहेत. बीअर शॉपीच्या परवान्यासाठी तक्रारदार व्यावसायिकाकडे अधीक्षक संजय पाटील यांच्या सांगण्यावरून दुय्यम निरीक्षक चेतन खारोडे, कार्यालयीन अधीक्षक अभय खताळ यांनी एक लाखाच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडे फिर्याद दाखल केल्यानंतर खताळसह खारोडे यांना रंगेहाथ जेरबंद करण्यात आले होते.

या घटनेनंतर अधीक्षक संजय पाटील कोल्हापुरातून पसार झाले होते. येथील लाचलुचपत प्रतिबंधक पथकाचे उपअधीक्षक सरदार नाळे व पथकाने पाटील यांच्या कोल्हापूर येथील शिवाजी पेठ येथील फिरंगाई तालीम, काळकाई गल्ली, आर.के.नगर व शिरदवाड (ता. शिरोळ) येथील घरांवर छापेमारी करून २८ तोळे दागिने, आलिशान मोटार, ८० लाखांचा बंगला तसेच रोख रक्कम अशी मालमत्ता उघडकीला आणली होती. अधीक्षक पाटील यांच्या शोधासाठी चंद्रपूर व कोल्हापूर येथील 'एसीबी'ची तीन पथके कार्यरत होती. कोल्हापूर, सातारा व पुणे जिल्ह्यांत संशयिताचा वावर असल्याचे उघड झाले होते. पथकाने पाचगणी (जि. सातारा) येथील फार्महाऊसवर छापा टाकून त्यास जेरबंद केले.

# माजी लष्करी अधिकारी काळे यांचा गाझातील हल्ल्यात मृत्यू



**गाझा :** गाझा पट्टीत इस्रायलच्या हल्ल्यात सोमवारी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा आणि संरक्षण विभागात 'संरक्षण समन्वय अधिकारी' म्हणून काम करणारे कर्नल वैभव अनिल काळे या माजी भारतीय लष्करी अधिकाऱ्याचा मृत्यू झाला. गेल्यावर्षी गाझा युद्धाला तोंड फुटल्यापासून गेलेला हा पहिला आंतरराष्ट्रीय बळी असल्याचे वृत्तसंस्थांनी म्हटले आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतोनिओ गुटेरेस यांनी या हल्ल्याची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे, इस्रायलनेही या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. कर्नल वैभव काळे (४६) हे मूळचे नागपूरचे होते. भारतीय लष्करातून सन २०२२मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यानंतर त्यांचे कुटुंब पुण्यात स्थायिक झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांनी '११ जम्मू-काश्मीर रायफल्स'मधून विविध आघाड्यांवर बजावली होती. दोनच महिन्यांपूर्वी ते संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा आणि संरक्षण विभागात रुजू झाले होते. कर्नल काळे सोमवारी सकाळी आपल्या सहकाऱ्यांसह संयुक्त राष्ट्रांच्या वाहनाने राफा येथील युरोपीय इस्पितळाकडे जात असताना त्यांच्या वाहनावर हल्ला झाला. त्यात त्यांचा मृत्यू झाला, तर त्यांचे सहकारी गंभीर जखमी झाले. काळे यांच्या मृत्यूबद्दल संयुक्त राष्ट्रांचे महासचिव गुटेरेस यांनी तीव्र शोक व्यक्त करण्याबरोबरच या हल्ल्याच्या संपूर्ण चौकशीची मागणी केली आहे, असे त्यांच्या कार्यालयाच्या उपप्रवक्त्या फराह हक् यांनी सांगितले.

### शस्त्रबंदीचे आवाहन

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा आणि संरक्षण अधिकाऱ्याच्या मृत्यूच्या वृत्ताने आपल्याला धक्का बसला आहे. गाझा संघर्षातील मृतांचा आकडा वाढतच आहे. त्यात केवळ नागरिकच नव्हे तर मानवीय दृष्टिकोनातून काम करणाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे तातडीने शस्त्रबंदी लागू करण्याबरोबरच ओलिसांचीही मुक्तता करण्यात यावी, अशी मागणी संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतोनिओ गुटेरेस यांनी केली आहे. कर्नल काळे एप्रिल २००४मध्ये भारतीय लष्करी सेवेत दाखल झाले होते. त्यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये सन २००९ ते २०१० दरम्यान सेवा बजावली होती. दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून त्यांनी बी.ए.ची पदवी संपादन केली होती. त्यानंतर त्यांनी वर्तनशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याची पदवी मिळवली.

# नांदेडच्या फायनान्स कंपनीवरील छाप्यात सापडले १७० कोटींचे घबाड




**नांदेड, प्रतिनिधी :** अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर आयकर विभागाने शिवाजीनगर येथील फायनान्स कंपनीसह त्यांच्या अन्य प्रतिष्ठानांवर छापे टाकून झाडाझडती घेतली होती. तीन दिवस चाललेल्या तपासणीमध्ये तब्बल १७० कोटी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता सापडली आहे. या कारवाईमध्ये सुमारे १७० कोटींच्या बेहिशेबी मालमत्तेची कागदपत्रे जप्त करण्यात आली. १४ कोटी रुपये रोख आणि आठ कोटी रुपये किमतीच्या १२ किलो सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. आचारसंहिता काळात ही देशात झालेली सर्वात मोठी कारवाई असल्याचा दावा केला जात आहे.

शिवाजीनगर येथील भंडारी फायनान्स प्रा.लि.ची दोन कार्यालये, कोठारी कॉम्प्लेक्समधील कार्यालय, आदिनाथ पतसंस्था आणि संजय भंडारी आणि त्यांच्या भावाच्या निवासस्थानी छापे टाकण्यात आले. आयकर विभागाच्या पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, परभणी, नांदेड येथील पथकाने एकाचवेळी ही कारवाई केली होती. या कारवाईनंतर अन्य फायनान्स कंपन्यांसह जिल्हाभरात मोठी खळबळ उडाली होती.

तब्बल २५ वाहनांतून ६० पेक्षा अधिक अधिकार्यांनी सूर्यो दयापूर्वीच संयुक्तपणे ही कारवाई सुरू केली. भंडारी फायनान्स व अन्य व्यवहारांसंदर्भात पुरावे हाती लागल्यानंतर आयकर विभागाने ही कारवाई केली. भंडारी यांचा मुख्य व्यवसाय जमीन खरेदी-विक्रीचा असून, तो नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यात पसरलेला आहे. या व्यवहारासाठीच त्यांनी खासगी फायनान्स कंपनी स्थापन केली असून, नातेवाईकांच्या नावावर वेगवेगळे व्यवसाय सुरू केले आहेत. मात्र, या व्यवहारात मोठ्या प्रमाणात रोखीने व्यवहार करत आयकर चुकविल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. दागिन्यांमध्ये २४ कॅरेट सोन्याची ५० पेक्षा अधिक बिस्किटे तसेच हिरे आणि अन्य दागिन्यांचा समावेश आहे. तसेच भंडारी यांच्या वेगवेगळ्या सात प्रतिष्ठानांमध्ये कागदपत्रे, सीडी, हार्डडिस्क व पेनड्राईव्हमध्ये ही बेहिशेबी मालमत्ता उघडकीस आली.

# चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचे काय?

चीनसंदर्भात आपले परराष्ट्रमंत्री एस जयशंकर कितीही शब्दबंबाळ दावे करोत किंवा आपले पंतप्रधान चीन हा शब्द उच्चारणेही टाळोत; भारतीय बाजारपेठेचे छुपे चीनप्रेम कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी लपणे अशक्य. जागतिक बाजाराची साद्यांत नोंद ठेवणाऱ्या 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इन्स्टिट्यूट' या संस्थेचा ताजा अहवाल हे दाखवून देतो. त्यावर तातडीने भाष्य आवश्यक ठरते. याचे कारण भारत-चीनसंदर्भात राहिलेले काही मुद्दे लवकरच सोडवले जातील, असे जयशंकर म्हणतात. यातून अर्थातच काही मुद्दे अद्यापही आहेत हे ध्वनित होते. वर, मग 'सुटलेले' मुद्दे कोणते असाही प्रश्न पडतो. असो. खरे तर आपल्या लोकशाहीचे मंदिर वगैरे असलेल्या संसदेत चीनसंदर्भात- 'कसलीही घुसखोरी झालेली नाही, ना कोणी भारतीय हद्दीत आले; ना कोणी येण्याचा प्रयत्न केला' अशा अर्थाची ग्वाही देशवासीयांस सर्वोच्च पातळीवरून दिली गेली आहे. तरीही जयशंकर म्हणतात काही मुद्दे शिल्लक आहेत. पण ते काय आणि कोणते हे विचारणे अडचणीचे. तेव्हा ते न विचारलेले बरे. जनसामान्यांस जे मुद्दे वाटतात ते सत्ताधीशांस वाटतीलच असे नाही. हा दृष्टिकोनाचाही फरक. त्यामुळे त्या चर्चेत जाण्यात काही अर्थ नाही. कारण आपण पाकिस्तानला घर में घुस के मारेंगेचे इशारे देत असताना चीन हा शब्ददेखील आपल्या मुखातून निघत नाही, हे आता सर्वज्ञात आहे. त्यामुळे तो विषय सोडून ज्यावर ठोस काही भाष्य करता येईल अशा विषयाकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते. म्हणून हा अहवाल. तो चीन हा पुन्हा एकदा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार झाल्याचे दाखवून देतो. आतापर्यंत अमेरिका हा आपला सर्वात मोठा व्यापारी भागीदार होता. तथापि या लोकशाहीवादी देशाची साथ भारताने सोडली असून आपल्या बाजारपेठेत अमेरिकेच्या जागी आता चीनची स्थापना झाल्याचे आकडेवारीवरून दिसते. याचा अर्थ भारतीय बाजारपेठेत सद्या:स्थितीत अमेरिकेपेक्षाही अधिक उत्पादने चीन-निर्मित आहेत. यंदाच्या ३१ मार्चला संपलेल्या आर्थिक वर्षात भारत-चीन व्यापाराची उलाढाल ११,८०० कोटी डॉलर्सहून (११८ बिलियन डॉलर्स) अधिक झाली आहे. या एका आर्थिक वर्षात चीनकडून भारतीय बाजारात होणाऱ्या आयातीत ३.२४ टक्क्यांनी वाढ झाली. भारतीय बाजारात आलेल्या चिनी उत्पादनांचे मूल्य १०,१७० कोटी डॉलर एवढे होते. या तुलनेत भारतातून शेजारी चीनच्या बाजारपेठेत शिरकाव करू शकलेल्या उत्पादनांचे मूल्य मात्र जेमतेम १६०० कोटी डॉलर्स (१६.६७ बिलियन डॉलर्स) इतकेच वाढले. याचा अर्थ सरळ आहे. भारतीय बाजारात चीनमधून येणाऱ्या उत्पादनांच्या तुलनेत त्या देशाच्या बाजारपेठेत जाणाऱ्या भारतीय उत्पादनांचे मूल्य अगदीच नगण्य आहे. यातही (म्हटले तर) लाजिरवाणे सत्य असे की २०१९ ते २०२४ या चार वर्षांच्या कालखंडात भारतातून चीनकडे होणाऱ्या निर्यातीत प्रत्यक्षात घटच झाली आणि त्याच वेळी चीनमधून भारतीय बाजारपेठेत येणारी उत्पादने मात्र वाढली. आपली निर्यातीतील घट ०.६ टक्के इतकी होती तर चीनमधून होणाऱ्या आयातीतील वाढ मात्र होती थेट ४४.७ टक्के इतकी. हे सत्य लाजिरवाणे ठरते याचे कारण याच काळात लडाखमधील गलवान खोरे परिसरात भारत-चीनमधील चकमकींत अनेक भारतीय जवानांचे बळी गेले. त्याआधी चीनमधून भारतात होणाऱ्या निर्यातीचे मूल्य होते ७०३२ कोटी डॉलर्स इतके. ते वाढत वाढत जाऊन १०,१७० कोटी डॉलर्सवर गेले. म्हणजे एका बाजूला चीनबरोबरच्या संघर्षात भारतीय सैनिकांवर निष्कारण रक्त सांडण्याची वेळ येत असताना भारतीय बाजार मात्र चीनमधून येणाऱ्या अनेकानेक उत्पादनांनी ओसंडून वाहू लागला होता. भारतीय हद्दीतील गलवान खोऱ्यात चिनी सैनिकांनी घुसखोरी करून भारतीय जवानांचा हकनाक बळी घेतला. त्यानंतर हे चिनी सैनिक संपूर्णपणे माघारी गेले किंवा काय याबाबत मतभेद आहेत. परराष्ट्रमंत्री जयशंकर भारत-चीन संबंधांबाबत 'राहिलेले मुद्दे' सोडवले जातील अशी आशा व्यक्त करतात ती याचबाबत. वास्तविक या संघर्षानंतर अनेकांनी नेहमीप्रमाणे चिनी उत्पादनांवर भारतीयांनी कसा बहिष्कार घालायला हवा वगैरे शहाणपणा सांगण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार अनेकांनी मग दिवाळीत वा अन्य सणासुदीस वापरले जाणारे चिनी बनावटीचे लुकलुकते विजेचे दिवे आदी खरेदीवर बहिष्काराचा निर्धार केला. तथापि असे करणे हे बादलीभर पाणी उपसल्याने समुद्र आटला असे म्हणण्यासारखे होते. ताजी आकडेवारी हे कटू सत्य अधोरेखित करते. घाऊक औषधे, औद्योगिक रसायने, संगणक, दूरसंचार उपकरणे इतकेच काय सौर ऊर्जा सामग्री आणि विजेच्या इत्यादी उत्पादनांवर चीनची जवळपास मक्तेदारी आहे आणि आपणास तूर्त तरी ही चिनी उत्पादने खरेदी करत राहण्यावाचून पर्याय नाही. चीनकडून जे काही आपण खरेदी करतो त्यातील बराच भाग फक्त स्मार्ट फोन्स वा त्यासाठी आवश्यक घटकांचा आहे. ही रक्कम साडेचारशे कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. लॅपटॉप, संगणक यांबाबतचे वास्तवही असेच. अलीकडे सौर ऊर्जा अणि विजेवर चालणाऱ्या चारचाकी मोटारींचे बरेच कौतुक केले जाते. आपल्याकडे तर आता पुढील युग यांचेच असाच अजागळ समज अनेकांचा दिसतो. यातही चीनची मक्तेदारी आहे आणि सौर ऊर्जा निर्मितीसाठीच्या पट्ट्या आणि विजेऱ्यांसाठी लागणारे लिथियम हे मूलद्रव्य आपणास चीनकडून खरेदी करावे लागते. चीनकडून या काळात आपण घेतलेल्या बॅटऱ्यांचेच मूल्य २२० कोटी डॉलर्सपेक्षाही अधिक आहे. हे ठीक. पण त्याच वेळी भारतातून चीनच्या बाजारात जाणाऱ्या वस्तूंत वाढ झाली असती तर ते एक वेळ समजून घेता आले असते. मात्र आपली निर्यात होती तेथेच स्तब्ध आणि त्याच वेळी चीनमधून होणाऱ्या आयातीत मात्र वाढ अशी ही आपली वेदना आहे. यावर केंद्र सरकारने 'उत्पादन-आधारित-उत्तेजन' (प्रॉडक्ट लिंक्ड इन्सेंटिव्ह- पीएलआय) ही योजना आणली खरी. पण त्याचे फलित दिसू लागले असे अद्याप म्हणता येत नाही. दूरसंचार, संगणकाचे सुटे भागादी उत्पादनांच्या निर्मितीसाठी या योजनेतून स्थानिक उद्योजकांस उत्तेजन दिले जाते. याचा फायदा अनेक परदेशी दूरसंचार कंपन्यांनीही घेतला आणि आपल्याकडे या क्षेत्रात लक्षणीय गुंतवणूक केली. नंतर रसायने, औषधे इत्यादी उत्पादकांस उत्तेजन मिळावे यासाठी ही योजना राबवली गेली. आपणास आवश्यक उत्पादने जास्तीत जास्त देशातच तयार करणे हा यामागील विचार. तसेच देशांतर्गत गरजा भागवल्यानंतर या योजनेतील उत्पादनांची निर्यातही होणे अपेक्षित आहे. ती काही प्रमाणात होऊ लागलीदेखील. तथापि ही गती अपेक्षेइतकी नाही. त्यामुळे भारत-चीन यांतील व्यापारतूट वाढतच असून भारतातून चीनच्या बाजारात विकल्या जाणाऱ्या उत्पादनांच्या तुलनेत चीनमधून भारतात येणाऱ्या उत्पादनांचे प्रमाण काही हवे तितके कमी होताना दिसत नाही. मध्यंतरी चीनमधील राजकीय-आर्थिक संकटामुळे अनेक परदेशी उत्पादकांनी चीनमधून काढता पाय घेतला. ही गुंतवणूक आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर येईल अशी आशा होती. पण व्हिएतनाम, मलेशिया, बांगलादेश आदींनी ती धुळीस मिळवली. चीनमधून स्थलांतर करू पाहणारे अनेक उद्योग या देशांत मोठ्या प्रमाणावर गेले. भारतात ते तितक्या प्रमाणात आले नाहीत. या सगळ्याचा अर्थ इतकाच की राजकीय-लष्करी पातळीवर आपणास आव्हान देणारा हा आपला शेजारी आर्थिक मुद्द्यांवरही आपली सतत अडचण करताना दिसतो. चीनकडे डोळे वटारून- लाल आँख दिखाकर- पाहण्याचा इशारा वगैरे ठीक. तो हवाच. पण त्याच्या जोडीला हे चीनवरील अवलंबित्व कमी कसे करता येईल हे पाहणे अधिक महत्त्वाचे.

# गर्भलिंग निदानाचा अवैध 'स्टार्टअप' समाजाला कुठे नेऊन ठेवणार?

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुलींच्या नरडीला नख लावण्याचे गुन्हेगारी आणि अमानवीय कृत्य करणारे नराधम कोणी अडाणी, अशिक्षित नसून चांगले उच्च विद्याविभूषित आणि ज्यांच्याकडे जीवनदाते म्हणून पाहिले जाते, असे वैद्यकीय व्यवसायातील लोक असल्याचे आजवर आपण ऐकून, वाचून होतो. पण, जिचा वैद्यकीय क्षेत्राशी दुरान्वयाने संबंध नाही, अशी तंत्रशिक्षण महाविद्यालयात शिकणारी एक विद्यार्थिनी हे कृत्य करत असल्याचे उघडकीस आल्याने खळबळ माजणे साहजिक आहे.

साक्षी थोरात. छत्रपती संभाजीनगरातील एका नामांकित तंत्रशिक्षण महाविद्यालयात शिकणारी विद्यार्थिनी. महापालिकेच्या आरोग्य पथकाने तिच्या फ्लॅटवर धाड टाकली असता, समोरचे दृश्य पाहून सगळेच हादरून गेले. एका पोर्टेबल मशीनच्या साहाय्याने ती गर्भलिंग चाचणी करत असल्याचे निदर्शनास आले. एका चाचणीसाठी ती ५० हजार रुपये घेत असल्याची माहिती समोर आली आहे. महिन्याला सुमारे वीस चाचण्या या हिशेबाने दरमहा ती दहा लाख रुपये कमावत असावी. यासाठी तिने एजंट नेमल्याचे कळते. गर्भलिंग चाचणी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि तंत्रज्ञान अवगत असायला हवे. मात्र, साक्षीने हे सारे कसब तिच्या मावस भावाकडून शिकून घेतले होते, जो अशाच गैरकृत्यामुळे सध्या तुरुंगात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अशा प्रकारे गर्भलिंग चाचणी करता येत असेल तर अशा साक्षी अथवा आणखी किती जणांनी हा गोरखधंदा थाटला असेल, हे कल्पनातीत आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या एका मुलीने सुरू केलेला हा अवैध 'स्टार्टअप' समाजाला कुठे नेऊन ठेवणारा आहे, याची कल्पनाही करवत नाही.

काही वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यात सुरू असलेले अवैध गर्भपात आणि गर्भलिंग निदान केंद्र उघडकीस आल्यानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. मुख्यत: दुष्काळी प्रदेशात मोठ्या प्रमाणात अवैध गर्भपात होतात, ही बाब बीड जिल्ह्यातील डॉ. सुदाम मुंडे प्रकरणातून समोर आली होती. या जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची संख्या अधिक आहे. ऊस तोडणीसाठी सहा-सहा महिने घराबाहेर राहणाऱ्या महिलांना बाळंतपण परवडणारे नसते. त्यामुळे या महिला गर्भपिशवी काढून टाकतात. सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे यातील गुन्हेगार गजाआड झाले. परंतु, अशा प्रकारांना पूर्णत: आळा बसू शकलेला नाही. याच प्रकारात दोषी ठरलेला जालना जिल्ह्यातील एक डॉक्टर अद्याप फरार आहे. त्याने तर अशा प्रकारचे कृत्य करण्यासाठी रुग्णवाहिकेचा वापर केल्याचे समोर आले. सहा महिने झाले तरी तो पोलिसांना सापडलेला नाही.

सरकारी यंत्रणांना चकवा देऊन अवैध मार्गाने सुरू असलेल्या अशा प्रकारांमुळे महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर प्रमाणात घट झाल्याची आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. १९९०च्या दशकात प्रसूतीपूर्व लिंग निर्धारण आणि गर्भातील विकृती शोधण्यासाठी अल्ट्रासाऊंडसारखे आधुनिक तंत्रज्ञान आल्यानंतर जन्माला येणारे मूल स्त्री जातीचे असेल तर तो गर्भ पाडून टाकण्याच्या प्रकारांत वाढ झाली आहे. पुरोगामी राज्य म्हणून नावलौकिक असलेल्या महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांत २०१९च्या तुलनेत घटलेले स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर प्रमाण हे येऊ घातलेल्या एका गंभीर सामाजिक समस्येचे लक्षण आहे. राज्याच्या आरोग्य उपसंचालकांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात या दुष्परिणामांचा उल्लेख टाळला असला तरी त्यांनी सादर केलेली आकडेवारी धक्कादायक आहे. आजवर असा समज होता की, मागास प्रदेशात स्त्री-पुरुष समानतेचा अभाव असतो. मात्र, अहमदनगर, सांगली, नागपूर, सोलापूर, लातूर, संभाजीनगरसारख्या तुलनेने प्रगत जिल्ह्यांचा समावेश या सामाजिक संकटाची व्याप्ती अधोरेखित करतो. गर्भलिंग निदान हा कायद्याने गुन्हा आहे. यासाठी 'पीसीपीएनडीटी' कायदाही आहे. परंतु, आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत जुजबी माहितीच्या आधारे अशा चोरीछुपे पद्धतीने केंद्रं चालविली जात असतील तर यंत्रणा कुठपर्यंत पोहोचणार? वास्तविक, साक्षीसारख्या सुशिक्षित मुलींनी अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे, या मुलीच अशा कृत्यात सामील असतील तर साक्षीदार म्हणून कोणाला पुढे करायचे?

# केसीआर यांच्या समोर गड राखण्याचे आवाहन

तेलंगणात लोकसभा निवडणुकीचा ज्वर शिगेला पोहोचला असून माजी मुख्यमंत्री आणि बीआरएसचे प्रमुख के. चंद्रशेखर राव (केसीआर) हे निकराची लढाई देत आहेत. तेलंगणात सलग दहा वर्षे राज्य केल्यानंतर विधानसभा निवडणुकीत त्यांचे पतन झाले आणि काँग्रेस पक्ष सत्तेत विराजमान झाला. लोकसभा निवडणुकीतही केसीआरसमोरील आव्हाने कमी होताना दिसत नाहीत. एकुणातच केसीआर यांच्यासमोर राजकीय पेच उभा राहिला आहे.

तेलंगणा विधानसभा निवडणुकीत केसीआर यांनी संपूर्ण शक्ती पणाला लावली होती. तरीही त्यांच्या मतांत दहा टक्के घट झाली. दुसरीकडे काँग्रेसने आपल्या मतांच्या टक्केवारीत वाढ करत त्यांना सत्तेतून खाली खेचले. विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या दणक्यातून केसीआर अजूनही सावरलेले नाहीत आणि त्यानंतर नेत्यांची गळती सुरू झाली. पक्षाचे चार विद्यमान खासदारांसह अनेक आमदार आणि माजी आमदारांनी राजीनामा देत अन्य पक्षांत प्रवेश केला. बीआरएसमधील या अनागोंदीमागे महत्त्वाचे कारण म्हणजे केसीआर नव्याने सक्षमपणे उभे राहू शकतील की नाही असा प्रश्न पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांत निर्माण झाला आहे. तसेच बीआरएसला पूर्वीप्रमाणे सत्ता मिळेल, याची हमी नेत्यांना राहिलेली नाही.

तेलंगणात केसीआर हे सक्षम आणि खंबीर नेतृत्व म्हणून ओळखले गेले आहे. राजकीय तज्ज्ञांच्या मते, केसीआर हे पुन्हा नव्याने उभारी घेऊ शकतात; परंतु त्यांच्या काळात झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे त्यांचा राजकीय मार्ग खडतर झाला आहे. केसीआरच्या काळातील भ्रष्टाचाराचा डंका संपूर्ण राज्यात वाजला आहे. अशावेळी केसीआर यांच्यासाठी नव्याने राजकीय बळ उभा करणे कठीण आहे. त्यांचे निकटवर्तीय प्रमुख नेत्यांनी त्यांची साथ सोडली. दिल्लीतील मद्य धोरण गैरव्यवहारात केसीआर यांची कन्या के. कविता अडकल्या आहेत. याप्रकरणी सध्या त्या तुरुंगात आहे. केसीआर हे आपल्या निवडणूक सभांत मुलीच्या अटकेचा मुद्दा प्रभावीपणे मांडताना दिसून येत नाहीत. यामागे भ्रष्टाचार प्रकरणापासून दूर राहण्याची त्यांची रणनीती हे सर्वात मोठे कारण असल्याचे मानले जात आहे.

मागच्या लोकसभा निवडणुकीचा विचार केला तर केसीआर यांच्या नेतृत्वाखालील बीआरएसने तेलंगणात सर्वाधिक नऊ जागा जिंकल्या. दुसरीकडे भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी तीन तीन जागा जिंकल्या होत्या. एमआयएमचे ओवेसी यांनी हैदराबाद लोकसभेची जागा जिंकली होती. पण आता राजकीय स्थितीत बदल झाला आहे. केसीआर आता राज्यातील सत्तेत नाहीत. परिणामी केसीआर यांना मागील लोकसभेसारखे यश मिळेल, असे वाटत नाही. अर्थात, विधानसभा निवडणुकीत बसलेल्या हादर्यानंतर ते संपूर्ण शक्तीनिशी मैदानात उतरले आहेत; परंतु त्यांची मोहीम कितपत प्रभावी ठरते, हे चार जूनच्या निकालातूनच कळेल.

दोन दशकांत पहिल्यांदाच केसीआरचे कुटुंब लोकसभेच्या रणभूमीत नसल्याचे दिसून येत आहे. केसीआर यांच्या कुटुंबातील एकाही सदस्यांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरलेला नाही. केसीआर किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी २००४ नंतर प्रत्येक लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत शड्डू ठोकले होते. तत्कालीन काळात तेलंगणा आंदोलन सक्रिय करण्यासाठी आणि या चळवळीला टीआरएस पक्षाचे रूप देण्यासाठी केसीआर यांनी तेलगु देसममधून राजीनामा दिला आणि स्वतंत्रपणे करीमनगरची लोकसभा आणि सिद्दीपेठची विधानसभा लढवली होती. दोन्ही जागांवर ते निवडून आले. मात्र सिद्दीपेठची जागा सोडली आणि ते केंद्रातील काँग्रेस नेतृत्वाखालील यूपीए सरकारमध्ये



मंत्री झाले. त्यानंतर केसीआरचे पुतणे आणि टीआरएसचे नेते हरीश राव हे पोटनिवडणुकीत सिद्दीपेठ येथून निवडून आले. मात्र, दोनच वर्षांत तेलंगणाच्या मुद्द्यावर काँग्रेसशी मतभेद झाले आणि २००६ आणि २००८ मध्ये करीमनगरमध्ये झालेल्या दोन पोटनिवडणुकीत टीआरएस संस्थापकांनी विजय मिळवला. २००९ मध्ये केसीआर मेहबूबनगर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले. या कार्यकाळात ते तेलंगणा राज्यांचे ध्येय मिळवण्यात यशस्वी ठरले. दुसरीकडे केसीआर यांचा मुलगा के. टी. रामाराव यांनी २००९ मध्ये सिरसिला विधानसभा जिंकली आणि त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. २०१० च्या पोटनिवडणुकीत ही जागा कायम राखली.

२०१४ मध्ये केसीआर यांनी मेदक लोकसभा आणि गझवेल विधानसभा लढवली. या दोन्ही ठिकाणी ते जिंकून आले. ११९ सदस्यीय तेलंगणा विधानसभेत टीआरएस यांना बहुमत मिळाल्यानंतर नव्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी मेदकची जागा सोडली. त्याच निवडणुकीत त्यांची मुलगी के. कविता निझामाबाद येथून लोकसभेवर निवडून गेल्या. केसीआरचा मुलगा, पुतण्या हे पुन्हा एकदा अनुक्रमे सिरसिला आणि सिद्दीपेठ येथून विधानसभेत निवडून आले.

टीआरएसने २०१८ च्या निवडणुकीत सत्ता कायम राखली. २०१९च्या निवडणुकीत के. कविता या भाजपच्या धरमपुरी येथून अरविंद यांच्याकडून पराभूत झाल्या. त्यानंतर विधान परिषदेवर निवडून गेल्या. २०२२ मध्ये केसीआर यांनी राष्ट्रीय राजकारणांवर लक्ष केंद्रित करत 'टीआरएस'चे नाव बदलून 'बीआरएस' केले. पण राज्यात दहा वर्षे सरकार चालविल्यानंतर पक्षाने मागच्या वर्षी पार पाडलेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव स्वीकारला आणि सत्तेतून पायउतार झाला. केसीआर यांनी दोन विधानसभा मतदारसंघ गझवेल आणि कामारेड्डी येथून निवडणूक लढवली होती. त्यांनी गझवेलची जागा राखली. मात्र, कामारेड्डी येथून ते पराभूत झाले. १९८५ नंतर त्यांचा हा पहिलाच पराभव होता. केटीआर आणि हरिश राव यांनी आपल्या जागा राखल्या. लोकसभा निवडणुकीत कविता या पुन्हा निझामाबाद मतदारसंघातून लढतील असा कयास बांधला जात होता. मात्र, केसीआर यांनी त्यांना मैदानात न उतरविण्याचा निर्णय घेतला. कविता यांना नुकतीच दिल्ली उत्पादन शुल्क धोरण गैरव्यवहार प्रकरणात अटक झाली आहे.

२३ वर्षांपूर्वी २७ एप्रिल रोजी टीआरएसची स्थापना झाली. केसीआर यांनी २००९ मध्ये आंध्र प्रदेशपासून तेलंगणा हे वेगळे राज्य करण्याच्या मागणीवरून ११ दिवस बेमुदत उपोषण केले. तेव्हा यूपीए सरकारसमोर त्यांची मागणी मान्य करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत केसीआर यांनी राज्यातील १७ लोकसभा मतदारसंघात १७ दिवसांचे अभियान सुरूकेले. मेहबूबनगर हा केसीआर यांचा गड मानला जातो आणि त्यांनी आपल्या प्रचाराची सुरुवात याच ठिकाणावरून केली. निवडणूक बस प्रवासात त्यांनी भाजप आणि काँग्रेसवर हल्लाबोल सुरू केला. मोदी सरकारच्या योजनांवर त्यांनी आक्षेप घेतला.

# पाकव्याप्त काश्मीरवरचा पाकिस्तानचा बेकायदा ताबा संपुष्टात येईल?



भारतातील निवडणुकांचा ज्वर सध्या सर्वत्र इतका चढलेला आहे की शेजारी पाकव्याप्त काश्मीरमध्ये चाललेल्या अभूतपूर्व आंदोलनांची धग जाणवत नाहीये. सार्वत्रिक महागाई, सरकारी अंशदानावर कुऱ्हाड, बेरोजगारी, अपुरा वीजपुरवठा, प्रचंड महाग होऊनही गायब असणारी कणीक... अशा साऱ्या कारणांमुळे पाकव्याप्त काश्मीरमधील केवळ शहरेच नव्हे, तर छोटी गावेसुद्धा पेटून उठल्यासारखी झाली आहेत. 'हमे चाहिए आझादी, लढके लेंगे आझादी, पाकिस्तान से आझादी, ये वतन हमारा है...' अशा घोषणा सर्वत्र ऐकू येत आहेत. गेल्या दीड वर्षातील असे तीव्र आंदोलन होण्याची ही तिसरी-चौथी वेळ. आंदोलकांचा पाकिस्तानी लष्करावर विशेष राग आहे. पाकिस्तानात लष्करासहित साऱ्याच व्यवस्था, यंत्रणांवर पोलादी पंजाबी पंजाची पकड आहे. हाही राग आंदोलनात दिसतो आहे. गेल्या काही दिवसांत शेकडो आंदोलक लष्कराच्या हल्ल्यात जखमी झाले आहेत. अनेक मरण पावले आहेत. मृतांचा खरा आकडा अर्थातच कुणाला माहीत नाही. 'ये जो दहशतगर्दी है, उसके पीछे वर्दी है...' या मिसरुड फुटलेल्या युवकांच्या घोषणांमागे हा लष्कराच्या दहशतीचा संताप दडलेला आहे. खरे तर सारा पाकिस्तानच आज आर्थिक आघाडीवर घोर संकटात सापडला आहे. मात्र, अशाही स्थितीत पाकिस्तानात पाकव्याप्त काश्मीर, गिलगिट-बाल्टिस्तान, सिंध आदी प्रांतांना भेदभाव सोसावा लागतो आहे. उपलब्ध अपुऱ्या संसाधनांमधील जेमतेम तुकडे त्यांच्या वाट्याला येतात. पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या वेळी सलग १२ दिवस जे आक्रमक आंदोलन झाले होते; तेव्हा काही भागांतील तापमान उणे २० सेल्सियस अंश होते. इतक्या थंडीत आंदोलक पेटून उठत असतील तर तिथल्या असंतोषाची कल्पना करता येते.

अशा परिस्थितीत पाकव्याप्त काश्मीरचे भवितव्य काय आणि त्यात भारताची भूमिका काय असणार, हा प्रश्न आहे. सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ज्या मुलाखती चालू आहेत, त्यातल्या एका मुलाखतीत त्यांनी हाताने कुलूप लावल्याची खूण करून 'पाकिस्तान के मुद्दे को ताला. वह खूष और शांती से रहे. हम बहुत आगे निकल चुके है...' अशी विधाने केली. भारताचे परराष्ट्रकारण आता पाकिस्तानकेंद्री असू किंवा होऊ शकत नाही, हे ते सूचित करीत होते. ते योग्यच आहे. मात्र, पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलक आणि त्यांचे नेते वारंवार 'आमच्याकडे पाहा. आम्हाला मदत करा...' असा टाहो भारताला उद्देशून फोडत असतील तर भारताने काय करायचे, असा मोठाच पेच भारतापुढे उभा राहिला तर आश्चर्य नाही. एकीकडे जम्मू-काश्मिरात विकासाच्या अनेक योजना प्रत्यक्षात येत असताना, तेथे शांतता नांदत असताना अनेक शतके जी आपली रक्ताची भावंडे होती; ती अर्धपोटी राहात असतील तर आपण काय करायचे, हा केवळ राजनैतिक नव्हे, तर नैतिकही पेच आहे. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी नुकतेच एका सभेत आजीचे स्मरण करून 'उस समय इंदिराजी ने पाकिस्तान के दो टुकडे कर दिये...' असे भाजपला सुनावले होते. इंदिरा गांधी यांचे ते विलक्षण धैर्य आणि कर्तृत्व अजरामर आहे. बांगलादेश प्रत्यक्ष स्वतंत्र होण्यापूर्वी अनेक महिने अशांत होता. त्याचा प्रचंड ताण भारतावर येत होता. बांगलादेश मुक्त करण्यासाठी शेख मुजीबूर रहमान यांनी स्थापलेली 'बांगला मुक्ती वाहिनी' भारताकडेच अपेक्षेने पाहात होती. भारताला त्या हाकेला ओ द्यावी लागली. आज पाकव्याप्त काश्मीरचे परागंदा नेते अमजद अयुब मिर्झा वारंवार भारतालाच साद घालत आहेत. काही तासांपूर्वी जारी केलेल्या ताज्या व्हिडीओत त्यांनी भारताला 'आता वेळ टळून चालली आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि गिलगिट-बाल्टिस्तान यांना भारताने लवकरात लवकर मुक्त करावे आणि पाकिस्तानच्या जोखडातून सोडवावे...' असे म्हटले आहे. आधीच्या व्हिडीओत तर त्यांनी 'आम्हाला भारतात विलीनच व्हायचे आहे...' असे म्हटले होते.

आज जगभरात प्रचंड तणाव आहे. दोन तर युद्धेच चालू आहेत. ती वाढण्याची शक्यता आहे. चीनला तैवान गिळायचा आहे. अशा वेळी पाकव्याप्त काश्मीरचे काय होणार, आणि भारत या समस्येत किती खोलवर बुडी मारू शकणार, हे आपल्याकडे नवे सरकार आल्याशिवाय समजणार नाही. अनेक केंद्रीय मंत्री 'पाकव्याप्त काश्मीर आपलाच आहे', असे वारंवार म्हणत असतात. प्रचारातही हे चालू आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'पाकव्याप्त काश्मीर भारतात येण्यासाठी युद्ध करावे लागणारच नाही...' असे म्हटले आहे. दुसरीकडे, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी मुंबईत 'एक दिवस पाकव्याप्त काश्मीरवरचा पाकिस्तानचा बेकायदा ताबा संपुष्टात येईल आणि तो भाग पुन्हा भारताशी जोडला जाईल...' असे मोठे विधान केले. ३७० कलम गेल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये नवे विकासपर्व सुरू झाले. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांचाही शांततापूर्ण विकासावर तितकाच अधिकार आहे. तो अधिकार भारताने लवकरात लवकर बहाल करायला हवा.

हे दैनिक मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक राजेंद्र एकनाथ दणके यांनी संजराज प्रिंटर्स, प्लॉट नं.१०, सर्व्हे नं. १२२, खांदवेनगर, नगररोड, पुणे ४७ येथे छापून साईबालाजी बंगलो, साईनगरी, चंदननगर पुणे-१४ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
**दैनिक लोकटाइम्स मुख्य कार्यालय :** ३९५, बी-३, विष्णुछाया अपार्टमेंट, मंगळवार पेठ, पुणे-११ Reg.No.SDM/PUNE/SR/48/2016 R.N.I.No. MAHMAR/2003/14034 ● E-mail:loktimes@gmail.com **ई आवृत्ती :** www.eloktimes.com
मुख्यसंपादक - ९४२२०३६४३७ फोन व फॅक्सः (०२०): ४१२६८३६०. **पिंपरी-चिंचवड कार्यालय :** १०७, पहिला मजला, मयुर ट्रेड सेंटर, फेज २- चिंचवड स्टेशन, पुणे-१९ जाहिरात व वितरण : ०२०-४१२६८३६०.
● **नवी दिल्ली :** डॉ. राजा तालुकादार - ०९८१०१९४४२३ या अंकातील कोणताही न्यायालयीन वाद पुणे न्याय कक्षेअंतर्गत. सदर अंकातील बातम्यांशी मालक, संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# लोकसभेच्या निकालाआधीच कार्यकर्त्यांकडून उमेदवारांचा विजय घोषित; भाजप पाठोपाठ महाविकासच्या कार्यकर्त्यांनीही लावले फलक



**पुणे, प्रतिनिधी :**
पुण्यात लोकसभा निडणुकांचा निकाल लागण्याआधीच महाविकास आघाडी व भाजपकडून आपल्या उमेदवारांचे खासदार झाल्याचे पोस्टर झळकले आहे. लोकसभा निवडणुकांचे निकाल ४ जूनला लागणार आहेत. मात्र त्यापूर्वी उतावीळ कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांना विजयी घोषित केलं.

पुण्यातील सारसबाग परिसरामध्ये आबा बागुल मित्र परिवाराने महाविकास आघाडीच्या उमेदवारांची विजयी पोस्टर लावले आहेत. भाजप कार्यकर्त्यांनी देखील मुरलीधर मोहोळ यांचे बॅनर लावले आहेत.

पुण्यातील मतदान संपल्यानंतर भाजपच्या वतीने मुरलीधर मोहोळ यांचे खासदार म्हणून पोस्टर लावले होते. त्यानंतर अमित बागुल यांनी सारसबाग परिसरामध्ये सुप्रिया सुळे, रवींद्र धंगेकर, अमोल कोल्हे यांना दणदणीत विजय केल्याबद्दल पोस्टर लावले आहेत. मात्र बॅनरवर मावळचे उमेदवार संजोग वाघेरे यांचा फोटो नाही, त्यामुळे राजकीय वर्तुळाच चर्चेला उधाणं आलं आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात लढत झाली आहे.

निकाल लागण्याआधीच भाजप आणि महाविकास आघाडीला पोस्टर लावण्याची घाई झाल्याचं यावरून दिसते. महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे उमेदवार मतदारांनी निर्धार करून मारला शिका, खासदार आमचा झाला पक्का, गुलाल आमचाच असा पोस्टरवर उल्लेख असणारे बॅनर सध्या पुणेकरांचे लक्ष वेधून घेतोय.

पुण्यात मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे. त्याचा फायदा कुणाला होणार कडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. पुण्यातील भाजप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवारांना आधीच विजय घोषित केल.

## निवडक

### बारामती शहरातील विनापरवाना होर्डिंग्ज उभारणी ऐरणीवर

**बारामती :** एकट्या बारामती शहरात जवळपास ७० होर्डिंग्ज असून एकाही होर्डिंगला रीतसर परवानगी घेतली नसल्याची बाब आता पुढे आली आहे. मुख्याधिकारी महेश रोकडे यांनीही याला दुजोरा दिला आहे. याबाबत बारामती नगरपालिकेने सर्व होर्डिंगधारकांना आतापर्यंत दोन वेळा नोटीस दिल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासगी मालमत्तेच्या ठिकाणी होर्डिंग्ज लावलेले असले तरी, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी आवश्यक असते. बहुसंख्य होर्डिंग्जबाबत परवानगीच घेतलेली नसल्याची बाब पुढे आली आहे. बारामती नगरपालिकेने मध्यंतरी होर्डिंगच्या दराबाबत धोरण निश्चित केले, त्यानंतर हे दर चढे असून ते कमी करण्याची मागणी केली होती.

प्रत्यक्षात मात्र नगरपालिकेने कोणालाही परवानगीच दिली नसल्याची बाब आता पुढे आली आहे. अनेक वर्षे बेकायदा होर्डिंग उभारून त्यातून उत्पन्न प्राप्त केल्यानंतर आता नगरपालिकेने पूर्वलक्षी प्रभावाने यात वसुली करण्याची बाब लोक बोलून दाखवीत आहेत.

बारामतीहून बाहेर जाणाऱ्या मोरगाव, फलटण, नीरा, इंदापूर, पाटस, भिगवण अशा सर्वच रस्त्यांवर मोठ्या संख्येने होर्डिंग्ज असून याचे स्ट्रक्चरल ऑडिट व त्याची कायदेशीर परवानगी तपासून घेण्याची मागणी होत आहे.

सुरक्षिततात गरजेची

अनेक होर्डिंग्ज महामार्गालगत असून वादळामुळे दुर्घटना घडल्यास रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांच्या जिवावर बेतू शकते. इतक्या मोठ्या आकाराची होर्डिंग्ज अनेक ठिकाणी लावण्यात आली आहेत. याची कायदेशीर बाजू व सुरक्षितता दोन्हींची जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशीही मागणी आहे.

### डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यात बुडून तरुणाचा मृत्यू, घोडेगाव परिसरातील घटना

**घोडेगाव (पुणे) :** गिरवली (ता. आंबेगाव) येथील स्वप्निल शिवाजी सैद (वय २९) याचा डिंभे धरण डाव्या कालव्यात बुडून मृत्यू झाला आहे. स्वप्निल सैद हरवला असल्याची फिर्याद भाऊ अजित शिवाजी सैद यांनी दि. १३ मे रोजी घोडेगाव पोलिस ठाण्यात दिली होती.

स्वप्निल हा भाड्याचे पैसे देण्यासाठी दत्तवाडीकडे दुचाकी (एमएच १४ - सीबी ०१७२) घेऊन गेला आहे. मात्र, तो अजूनही मिळून आला नाही, अशी माहिती दिली. त्यानंतर गावातील काही लोकांना स्वप्निल ज्या दुचाकीवरून जात होता ती दुचाकी कालव्याच्या कडेला मिळून आली. तेव्हापासून ग्रामस्थ व पोलिस त्याचा शोध घेत होते.

स्वप्निल सैद याला पोहता येत नव्हते. दरम्यान, दि. १४ मे रोजी चास पांडुरंगवाडीजवळ कालव्यामध्ये असलेल्या मोटारच्या लोखंडी पाईप व वायरला एक मृतदेह अडकला असल्याचे दिसून आले. जवळ जाऊन पाहिले असता हा मृतदेह स्वप्निल सैदचा असल्याची ओळख पटली. त्यानंतर ग्रामस्थांनी पोलिस स्टेशनला याबाबत कळविले. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार संतोष मुळुक, बी.व्ही. वाघ करीत आहेत.

### मनी लॉन्डरिंगमध्ये पोलीस कारवाईची भिती दाखवत तरुणाची २९.४९ लाख रुपयांची फसवणूक

**वाघोली –** तुमच्या विरोधात मनी लॉन्डरिंगची तक्रार आहे तुम्हाला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात यावे लागेल. अशी कारवाईची भीती दाखवून तरुणाची तब्बल २९.४९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वाघोली येथील ३३ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार, तक्रारदार तरुणाच्या मोबाईलवर सायबर चोरटयांनी फोन केला. तुमचे नाव मनी लॉन्डरिंगमध्ये असल्याने पार्सल कस्टम विभागाकडे अडकले आहे. तसेच त्यात अवैध अमली पदार्थ सापडले आहे.

तुमच्या नावाचा गैरवापर केला जात असून त्यासाठी तुमचे आधारकार्ड व बँक खात्याचा वापर करून मनी लॉन्डरिंग करण्यात आली आहे असे सांगून एक लिंक पाठविली. त्यांनतर पोलीस अधिकारी बोलत असल्याचे सांगून चौकशीसाठी गुन्हे शाखेच्या कार्यालयात हजर व्हावे लागेल असे सांगितले. तसेच अटकेची भीती दाखवली.

तुमच्या बँक खात्याची पडताळणी करायची असून तातडीने खासगी बँकेतील रोकड सरकारी बँकेत जमा करावी लागेल, असे सांगत तक्रारदार यांना २९ लाख ४९ हजार रुपये चोरटयांनी सांगितलेल्या खात्यावर ट्रान्सफर करायला सांगितले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने तरुणाने पोलिसांकडे धाव घेतली. पुढील तपास लोणीकंद पोलीस करीत आहेत.

## दुचाकी मालिकेतील आकर्षक क्रमांक तीनपट शुल्क भरुन चारचाकींसाठी राखून ठेवता येणार

**पुणे, प्रतिनिधी :**
पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून खासगी चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांकाबाबत दुचाकीसाठी आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक चारचाकींसाठी हवे असलेल्या वाहन मालकांनी विहित तीनपट शुल्कासह १५ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे धनाकर्ष (डीडी) १६ मे रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव करण्यात येईल.

दुचाकी वाहन मालकांनी आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरून हवे असल्यास १६ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे डीडी १७ मे रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव करण्यात येईल.

अर्ज कार्यालयाच्या खासगी वाहन नोंदणी विभागात डीडी, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'आर.टी.ओ.,पुणे' यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर न केल्यास राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व शुल्क सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणेच्या कार्यक्षेत्रातील वाहनधारकांनीच अर्ज सादर करावेत, कार्यक्षेत्राबाहेरील अर्ज, चुकीच्या रकमेचा डीडी जोडलेले तसेच अचूक मोबाईल क्रमांक न लिहिलेले अर्ज बाद ठरविण्यात येणार असल्याचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

## रवींद्र धंगेकर यांच्यावर गुन्हा दाखल; पोलीस ठाण्यातील ठिय्या प्रकरणी कारवाई



**पुणे, प्रतिनिधी :**
कसब्याचे आमदार आणि पुणे लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यावर पुण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुणे पोलिसांनी धंगेकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. दोन दिवसांपूर्वी रवींद्र धंगेकर यांनी सहकार नगर पोलीस ठाण्यात जाऊन भाजप विरोधात आंदोलन केले होते. बेकायदेशीर पद्धतीने जमाव केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी याप्रकरणी जो कायदा व सुव्यवस्था बिघडवेल त्यावर गुन्हा दाखल होईल अशी ग्वाही दिली होती. त्यानंतर हा गुन्हा दाखल झाला आहे. रवींद्र धंगेकर यांनी मतदानाच्या एक दिवसआधी म्हणजे १२ मे रोजी सहकार नगर पोलीस ठाण्यात जाऊन आंदोलन केले होते. भाजपकडून पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र धंगेकर यांच्यासह ३५ ते ४० कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. कलम १४३, १४५, १४९, १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५, लोकप्रतिनीधी अधिनियम १९५१ चे कलम १२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत त्यांनी भाजप विरोधात आंदोलन केले होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहितेचा भंग करून बेकायदेशीर जमाव जमवणे आणि घोषणा देऊन वरील आदेशाचे उल्लंघन करणे यासाठी त्यांच्याविरोधात गुन्हा दखल करण्यात आला आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी धंगेकर यांनी कार्यकर्त्यांसह सहकारनगर पोलीस ठाण्यात जाऊन मांडले होते. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला होता.

## चौका चौकात मृत्यूचे सापळे! अनधिकृत होर्डिंगवरील कारवाईत काळेबेरे

**पुणे, प्रतिनिधी :**
महापालिकेने दोन हजार ४०० पेक्षा जास्त होर्डिंगला मान्यता दिली आहे. फक्त ८५ अनधिकृत होर्डिंग शहरात आहेत, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. रस्त्याच्या कडेला, इमारतींवर महाकाय होर्डिंग उभी आहेत. त्यात राज्य सरकारने केलेल्या नियमावलीचे उल्लंघन केले तरी कारवाई होत नाही. होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट संबंधित व्यावसायिक करतो, पण त्याची उलटतपासणी करण्याची यंत्रणाच महापालिकेकडे नसल्याने केवळ कागदोपत्री घोडे नाचविले जात आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका आहे.गेल्या महिन्यात नगर रस्त्यावर वाघोली येथे वादळी पावसात भले मोठे होर्डिंग कोसळले. सुदैवाने त्यात कोणालाही इजा झाली नाही. त्यानंतर सोमवारी (ता. १३) मुंबई येथे आलेल्या वादळात होर्डिंग पडून १४ जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा होर्डिंगच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

व्यावसायिक, कंपन्या, शैक्षणिक संस्था, क्लासचालक, राजकीय पुढारी यांचे कार्यक्रम व इतर उपक्रमाच्या जाहिरातींसाठी चौकांमधील, रस्त्यावर होर्डिंगला प्राधान्य देतात. यातून होर्डिंग व्यावसायिकाला महिन्याला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. असे होर्डिंग उभारण्यासाठी महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाची परवानगी आवश्यक असते.

उलटतपासणीच नाही

महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाकडून नवीन होर्डिंगला परवानगी देताना किंवा जुन्या परवान्याचे नूतनीकरण करताना होर्डिंग व्यावसायिकांकडून सुरक्षेच्या दृष्टीने मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून इमारतीची क्षमता, दोन अडीच टनाचा मोठा लोखंडी सांगाडा सुरक्षित असल्याचा अहवाल दिला जातो.

पण महापालिकेने आतापर्यंत एकदाही होर्डिंग, संबंधित इमारत खरेच मजबूत आहे का? याची उलटतपासणी केलेली नाही. वाघोली येथे होर्डिंग पडल्यानंतर शहरातील सर्व होर्डिंगची तपासणी केली जाईल, अशी घोषणा केली होती. मात्र, त्यावर पुढे काहीच झाले नाही.



## जादूटोण्याची भीती दाखवून महिलेकडून खंडणी उकळली; उत्तर प्रदेशातील भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे, प्रतिनिधी :**
जादूटोण्याची भीती दाखवून महिलेकडून खंडणी उकळण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी उत्तर प्रदेशातील भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कृष्णनारायण तिवारी (वय ३०), अंतिमा कृष्णा तिवारी (दोघे रा. शक्तीनगर, गौंडा, उत्तर प्रदेश) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या बाबत एका महिलेने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला वानवडी भागात राहायला आहे. एका परिचितामार्फत ती आरोपींच्या संपर्कात आली होती. आरोपींना घरावर कोणीतरी काळी जादू केली आहे. काळी जादू नष्ट करण्यासाठी विधी करावा लागेल, अशी बतावणी केली. त्यानंतर तिवारी महिलेच्या घरी गेला. आरोपींनी महिला आणि तिच्या लहान मुलीला सरबत प्यायला दिले. त्यानंतर तिला गुंगी आली. आरोपींनी महिलेची मोबाइलवर छायाचित्रे काढली. त्यानंतर आरोपींनी महिलेशी पुन्हा संपर्क साधला. महिला आणि मुलीची छायाचित्रे समाजमाध्यमात प्रसारित करतो, अशी धमकी दिली. महिलेकडून आरोपींनी वेळोवेळी पैसे उकळले. तिच्याकडून दागिने घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे तपास करत आहेत.

## पुण्यात केअर टेकर तरुणीवर बलात्कार, शेअर दलाल असलेला बिल्डर गजाआड

**पुणे, प्रतिनिधी :**
आईच्या सेवा शुश्रूषेसाठी कामावर ठेवलेल्या तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी मार्केट यार्ड भागातील एका बांधकाम व्यावसायिकास अटक करण्यात आली. प्रवीण बंब (वय ४५, रा. लालबाग सोसायटी, गुलटेकडी) असे अटक आरोपीचे नाव आहे. याबाबत एका तरुणीने गुलटेकडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मबंब याची आई आजारी आहे. तिच्या शुश्रूषेसाठी त्याने तरुणीला कामावर ठेवले होते. ओळखीचा गैरफायदा घेऊन आरोपीने तिच्यावर घरात अत्याचार केले, तसेच खडकवासला येथील एका लॉजवर नेऊन तिला धमकावले. बळजबरीने बीअर पाजून बलात्कार केला. घडलेल्या प्रकाराची माहिती कोणाला दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिली.

घाबरलेल्या तरुणीने पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यांनतर बंबला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे. बंब हा बांधकाम व्यावसायिक असून, तो शेअर दलाल म्हणून काम करतो. सहायक पोलिस निरीक्षक राहुल कोलंबीकर तपास करीत आहेत.

## दौंडसाठी ३८ कोटींचा दुष्काळ निधी मंजूर

**दौंड, प्रतिनिधी :**
दौंड तालुक्यामध्ये ३८ कोटी रुपये दुष्काळ निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी आत्तापर्यंत २३ कोटी ७० लक्ष रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले आहेत, अशी माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली.

तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मध्ये कमी स्वरूपाचा पाऊस झाला. यामुळे आमदार कुल यांनी दौंड तालुका हा दुष्काळग्रस्त तालुका म्हणून जाहीर करावा यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने तालुक्याला मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केला. तालुक्यातील जिरायती व बागायती भागात कमी जास्त प्रमाणात प्रति हेक्टरी रुपये याप्रमाणे तालुक्यासाठी ३८ कोटींचा निधीचे वाटप करण्यात येणार आहे. या कामी शासनाच्या डीबीटी पोर्टलवर याद्या अपलोड करण्यात आल्या आहेत. हा निधी केवायसी नंतर थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला आहे. यासाठी दौंडचा महसूल विभाग व कृषी विभाग यांच्या वतीने गावोगावचे तलाठी व कृषी सहाय्यक यांनी गाव निहाय याद्या बनवून अपलोड केल्या होत्या. तहसीलदार अरुण शेलार व तालुका कृषी अधिकारी राहुल माने यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी चांगले काम केल्यामुळे दौंडला दुष्काळ निधी वितरित करण्यात आला, अशी माहिती कुल यांनी दिली.

दरम्यान, गेल्या वर्षी सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. आमदार कुल यांच्या प्रयत्नामुळे तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले, असे कासुर्डी येथील शेतकरी गोपीनाथ भोंडवे यांनी सांगितले.


**IICARE Foundation**

Request for Expression of Interest (EOI) / Quote

IICARE Foundation is implementing project "Improved Cook Stoves Distribution for Women Empowerment and Environmental Sustainability". IICARE Foundation intends to Procure the Following Item

1. Supply of Improved Cook Stoves.

IICARE Foundation invites EOI/Quote for Improved Cook Stoves eligible parties/ firms/organizations to submit their EOI/Quote. Interest parties may submit detailed quotation to the following address within 7 days of the publication of the advertisement.

**IICARE Foundation**
Operational Address: Atal Incubation Center, Shardanagar, Baramati, Dist Pune -413115.
Email :bhapkarvm@gmail.com
Website: www.iicare.org
Contact No.: +91 9011004424

# मुंबईतील होर्डिंग माफियांना महाभ्रष्टयुती सरकारचं संरक्षण; नाना पटोलेंचा घणाघात

**मुंबई , प्रतिनिधी :** घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळून झालेल्या अपघातातील मृत्यू हे बीएमसी प्रशासन व राज्य सरकारच्या बेपर्वाईचे बळी आहेत. मुंबईत पावसाळ्यात अनेक दुर्घटना घडतात व दुर्घटना झाल्यानंतर महापालिका प्रशासन, राज्य सरकारला जाग येते. घाटकोपरची घटना हा त्यातीलच एक प्रकार असून मुंबईतील होर्डिंग माफियांना भाजपा-शिंदे-अजित पवार सरकारचे संरक्षण आहे असा घणाघाती आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

नाना पटोले म्हणाले की, घाटकोपरमधील होर्डिंग दुर्घटनेत आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू तर जवळपास ८८ जण जखमी झाल्याची दुर्घटना अत्यंत वेदनादायी आहे. या घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत सरकारने जाहीर केली असली तरी ही मदत अत्यंत तुटपुंजी आहे. ही रक्कम वाढवून दिली पाहिजे तसेच जखमींच्या उपचाराचा सर्व खर्च राज्य सरकार, मुंबई महानगरपालिकेने केला पाहिजे. राज्यातील महाभ्रष्टयुती सरकारमुळे मुंबईची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे, कमशिनच्या हव्यासातून मुंबई शहर बकाल केले आहे. घाटकोपरमधील होर्डिंग हे एक उदाहरण आहे, अशी हजारो होर्डींग अनधिकृत रितीने शहरभर झळकत आहेत असा आरोप त्यांनी केला.



तसेच मुंबई महानगर पालिका, राज्य सरकार व पोलीस प्रशासनाचे आशीर्वाद असल्याशिवाय असे अनधिकृत होर्डिंग लावले जावू शकत नाहीत. घाटकोपरच्या होर्डिंगला कोणी परवानगी दिली होती, त्यामागे कोणत्या राजकीय नेत्याची शिफारस होती का, या सर्वांची सखोल चौकशी करून खऱ्या दोषींवर कारवाई झाली पाहिजे. कारवाईच्या नावाखाली कोणाला तरी बळीचा बकरा करुन महाभ्रष्ट युती सरकार आपली सुटका करुन घेऊ शकत नाही असंही पटोलेंनी म्हटलं.

दरम्यान, अवैध होर्डिंग असो वा मोडकळीस आलेल्या इमारती, महानगरपालिका फक्त नोटीस पाठवून आपली जबाबदारी झटकण्याचे काम करत असते आणि दुर्घटना झाल्यानंतर थातूर मातूर कारवाई केली जाते. मागील दोन वर्षांपासून मुंबई महापालिकेत प्रशासकीय कारभार सुरु आहे. सत्ताधारी पक्षाचे दोन पालकमंत्री महापालिकेच्या कार्यालयात स्वतःची कार्यालये थाटून बसले आहेत. हे दोन्ही पालकमंत्री काय झोपा काढत होते का? का बीएमसीच्या कार्यालयातून फक्त वसुलीचे काम करत होते? आता दुर्घटना झाल्यानंतर जबाबदारी झटकून दुसऱ्यांवर आरोप करण्याची नौटंकी भाजपा नेते करत आहेत असा गंभीर आरोपही नाना पटोले यांनी केला.

---

## निवडक

### मुंबईत मलेरिया, डेंग्यू, लेप्टो रोखण्यासाठी बीएमसीची खास मोहीम

**मुंबई** : पावसाळा सुरू झाल्यानंतर मलेरिया, डेंग्यू, लेप्टो यांसारखे आजार मोठ्या प्रमाणात पसरतात. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग व कीटकनाशक विभागाने मोहीम हाती घेतली आहे. त्या अंतर्गत मलेरिया, डेंग्यू पसरवणाऱ्या डासांची तीनशेपेक्षा अधिक उत्पत्तीस्थळे नष्ट करण्यात येत आहेत. तसेच मलेरिया व डेंग्यू परसवण्यासाठी कारणीभूत ठरत असलेल्या पाच हजारपेक्षा जास्त आस्थापनांना पालिकेकडून नोटीस बजावण्यात आली आहे. जानेवारीपासून एप्रिलपर्यंत मुंबईतील विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या कारवाईंतर्गत मलेरियाचा फैलाव करणाऱ्या नाफिलिस डासांची ३ हजार ३६१ तर डेंग्यूचा फैलाव करणाऱ्या एडिस डासांची ३३ हजार ७३६ उत्पत्तीस्थळे नष्ट केली. यामध्ये सर्वाधिक ठिकाणे ही झोपडपट्टी परिसरातील होती. तसेच अशी ठिकाणे आढळणाऱ्या ५ हजार २५२ आस्थापनांना मुंबई महानगरपालिकेकडून नोटीस पाठविण्यात आली आहे, अशी माहिती महानगरपालिकेच्या कीटकनाशक विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. पालिका आयुक्तांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने व कीटकनाशक विभागाने एक कृती आराखडा तयार केला आहे.

**'या' ठिकाणी होते कारवाई**

मुंबई महानगरपालिकेच्या कृती आराखड्यानुसार कचरा टाकण्याच्या जागा, राडारोडा, टायर, ट्युब, भंगार ठेवलेल्या जागा, पाण्याच्या टाक्यांचा परिसर घरातील सजावटी फुलदाण्या, झाडांमधील पाणी, पिंप या ठिकाणी साचणाऱ्या पाण्यामध्ये डासाची उत्पत्ती होते. त्यामुळे ही ठिकाणे नष्ट करण्यासह कोठेही पाणी साचू न देण्यासाठी कीटकनाशक विभागाकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

### परवानगी घेवूनच 'भिडू' म्हणायचं! नाहीतर २ कोटींचा दंड : जॅकी श्रॉफ यांची हायकोर्टात याचिका

**मुंबई :** अभिनेता जॅकी श्रॉफ यांनी परवानगीशिवाय त्यांचा आवाज, नाव आणि भिडू शब्द वापरण्यास बंदी घातली आहे. यासंदर्भात त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयासमोर विशेष अर्ज सादर केला आहे. विना परवानगी आपलं नाव, फोटो, आवाज आणि भिडू शब्द वापरणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि २ कोटी १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. बॉलीवूडमध्ये जॅकी श्रॉफ यांचा मोठा चाहता वर्ग आहे. त्यांनी भिडू हा शब्द उच्चारणे चाहत्यांसाठी पर्वणी ठरते. त्यांच्या अभिनयाचीही ती ओळख आहे. परवानगीशिवाय आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वापर होत असल्याबद्दल जॅकीने नाराजी व्यक्त केली आहे. याविरोधात त्यांनी आज (१४ मे) दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

काय आहे जॅकी श्रॉफ यांची मागणी?

आपलं नाव, निवड आणि भिडू शब्दाच्या वापराबाबत अधिकार हवे आहेत, असे जॅकी श्रॉफ यांनी आपल्या याचिकेत नमूद केले आहे. विना परवानगी आपलं नाव, फोटो, आवाज आणि भिडू शब्द वापरणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि २ कोटी १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा, अशी मागणीह त्यांनी याचिकेतून केली आहे. उच्च न्यायालयाने सध्या सर्व आरोपींविरुद्ध समन्स जारी केले आहेत आणि एमईआयटीवाय (तंत्रज्ञान विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय) यांना अशा सर्व लिंक्स काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. अभिनेत्याच्या वैयक्तिक अधिकारांचे अनधिकृतपणे उल्लंघन केले जात आहे . या प्रकरणी बुधवार १५ मेला न्यायालयात सुनावणी होणार आहे.

काय म्हणाले जॅकी श्रॉफ यांचे वकील?

जॅकीचे वकील प्रवीण आनंद यांनी न्यायालयाला सांगितले की, जॅकी श्रॉफ यांची प्रतिमा डागाळली जात आहे. अश्लील मीम्समध्ये त्यांच्या नावाचा गैरवापर केला जात आहे. याशिवाय त्याच्या आवाजाचाही गैरवापर होत आहे. त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन थांबविण्यात यावे. अभिनेत्याची जॅकी श्रॉफ, जॅकी, जग्गू दादा आणि भिडू अशी वेगवेगळी नावे कोणत्याही व्यासपीठावर वापरण्यास बंदी घालण्याची मागणीही करण्यात आली आहे.

---

# घाटकोपरसारखीच चूक २१ वेळा; होर्डिंग दुर्घटनेला जबाबदार असलेला भावेश भिंडे बलात्कार आणि विनयभंगातील गुन्हेगार

**घाटकोपर, प्रतिनिधी :** घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. वादळी वाऱ्यानंतर पेट्रोल पंपावर १२० फुटांचे होर्डिंग कोसळल्याने १४ जणांचा मृत्यू झाला तर ७५ लोक जखमी आहेत. त्यातील ४४ जणांवर रुग्णालयात सध्या उपचार सुरु आहेत. ईगो प्रायव्हेट मिडिया कंपनीचे बेकायदा होर्डिंग कोसळल्याने हा अपघात झाला. त्यामुळे या कंपनीचे संचालक भावेश भिंडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आता भावेश प्रभुदास भिंडे याच्याबाबत धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

घाटकोपरच्या पंतनगर भागात असलेल्या पेट्रोल पंपावर सोमवारी महाकाय होर्डिंग कोसळून १४ जणांचा नाहक बळी गेला. महापालिकेने इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेडला हे होर्डिंग्ज लावल्याबद्दल नोटीस बजावली होती. मात्र त्यानंतरही हे होर्डिंग हटवण्यात आली नाही. इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने हे होर्डिंग बेकादेशीररित्या लावले होते. भावेश भिंडे हे याच कंपनीचे संचालक आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भावेश भिंडे यांच्यासह अन्य काही जणांवर ३०४,३३८,३३७, ३४ अंतर्गत पंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिंडेकडे होर्डिंगचे कंत्राट १० वर्षांच्या भाडेतत्त्वावर होते.

मुंबई महापालिकेने जास्तीत जास्त ४०x४० चौरस फूट आकाराच्या होर्डिंगला परवानगी देते. मात्र हे बेकायदेशीर होर्डिंग १२०x१२० आकाराचे होते. या दुर्घटनेनंतर मुंबई पोलिसांनी सोमवारी रात्री मुलुंड येथील भावेश भिंडे याच्या घराची झडती घेतली. मात्र, पोलिसांना भिंडेचा शोध लागला नाही. त्याचा मोबाईल फोन सध्या बंद असल्याने अधिकाऱ्यांनी त्याला शोधण्यासाठी पथके तयार केली आहेत, असे पोलिसांनी सांगितले.



कोण आहे भावेश भिंडे?

भावेश भिंडेंबाबत धक्कादायक माहिती पुढे आली आहे. भावेश भिंडेंने २००९ साली विधानसभा निवडणूक देखील लढवली होती. १५ वर्षापूर्वी दिलेल्या शपथपत्रामध्ये भिंडे यांनी मुंबई महानगरपालिका (एमएमसी) कायद्यांतर्गत २१ प्रकरणांमध्य परवानगीशिवाय होर्डिंग लावल्याबद्दल आणि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स (एनआय) संबंधित दोन गुन्ह्यांमध्ये दंड ठोठावण्यात आला होता. या २१ प्रकणांमध्ये एमएमसी कायद्याच्या कलम ३२८ आणि ४७१ (दंड) अन्वये आणि दोनदा एनआय कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. तसेच इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, भिंडे याच्याविरुद्ध मुलुंड पोलीस ठाण्यात २४ जानेवारी रोजी बलात्कार आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याला मुंबई उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला होता.

---

## पंतप्रधान मोदींची आज कल्याण पश्चिमेत जाहीर सभा, आसपासच्या भागांमध्ये वाहतूकीत बदल



**डोंबिवली, प्रतिनिधी :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उद्या १५ मे रोजी कल्याण पश्चिमेत जाहीर सभा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सभा होणाऱ्या ठिकाणाच्या परिसरामध्ये वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. ठाणे शहर पोलीस उप आयुक्तांकडून याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ठाणे, भिवंडी , कल्याण लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार कपिल पाटील, डॉ. श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या कल्याणात येत आहेत. कल्याण पश्चिमेतील व्हर्टेक्स मैदानावर ही जाहीर सभा होणार असून त्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या सभेसाठी आधारवाडी परिसरात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या जाहीर सभेसाठी सुमारे १ लाखांच्या आसपास नागरिक येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर सभास्थळाच्या आसपासच्या परिसरातील वाहतुकीत वाहतूक पोलिसांकडून मोठे बदल करण्यात आले आहेत. आज म्हणजेच मंगळवार रात्री १२ वाजल्यापासून उद्यापर्यंत हे बदल लागू असणार आहेत.

## छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन



**मुंबई, प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रवींद्र पेठकर, कक्ष अधिकारी घनश्याम जाधव, विजय शिंदे आदीसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

---

# नेत्यांसाठी रस्ते बंद करू नका, मलबार हिलवासियांचा अनोखा जाहीरनामा; मुख्यमंत्र्यांवर रहिवासी नाराज

**मुंबई , प्रतिनिधी :** नेत्यांच्या वाहनांना जागा करून देण्यासाठी परिसरात रस्ते बंद करून नका, सह्याद्री अतिथी गृह आणि वर्षा बंगल्यावर होणाऱ्या राजकीय बैठका मंत्रायलात घ्या अशा स्वरुपाच्या मागण्या मलबार हिल येथील रहिवाशांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर केल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांच्या गाड्यांमुळे परिसरात प्रचंड वाहतूककोंडी होत असल्याचा आरोप या परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच शिंदे यांच्याबरोबरच शिवसेनेच्या उमेदवार यामिनी जाधव यांच्याविरोधातही नागरिकांनी उघडउघड नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे भाजपच्या पारंपरिक मतदारांना आता ठाकरे सेनेचा उमेदवार जवळचा वाटू लागला आहे.

मुंबईतील सर्वात उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या मलबार हिल परिसरात मात्र वाहनतळाच्या विषयावरून नागरिक संतापले आहेत. या परिसरातील नागरिकांनी लोकसभेच्या निवडणूकीच्या तोंडावर आपला जाहीरनामा तयार केला आहे. या जाहीरनाम्यात मलबार परिसरातील विविध प्रश्नांसंबंधी मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये पर्यावरण, प्रदूषण हे विषय मुख्यत्वे घेण्यात आले असून त्यानंतर वाहनतळाचा मुद्दा मांडण्यात आला आहे.

**यामिनी जाधव यांची अनुपस्थिती**

दक्षिण मुंबईत महायुतीतर्फे शिंदे यांच्या शिवसेनेच्या यामिनी जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे अरविंद सावंत उभे आहेत. त्यामुळे शिवसेनेच्याच दोन



उमेदवारांमध्ये ही लढाई होणार आहे. मलबार हिल हा परिसर भाजपचा पारंपरिक मतदारसंघ असून त्यांना यावेळी शिवसेनेच्या दोन उमेदवारांमधून एक उमेदवार निवडावा लागणार आहे. मात्र मलबार हिलच्या रहिवाशांनी आपला जाहीरनामा देण्यासाठी यामिनी जाधव आणि सावंत यांना निमंत्रण दिले असता जाधव यांनी प्रतिसाद दिला नाही असे रहिवाशांचे म्हणणे आहे. तर अरविंद सावंत यांनी मात्र रविवारी कमला नेहरू उद्यानात रहिवाशाची भेट घेतली. त्यामुळे भाजपच्या या मतदारांमध्ये उमेदवाराबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

**जाहीरनाम्यात मागण्या कोणत्या?**

चांगले रस्ते, पदपथ, वाहनतळाची सुविधा, मलबार हिलमधील हिरवाई टिकवावी, मलबार हिल जलाशय जतन करावे, हॅंगिंग गार्डनला धक्का लावू नये, रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांना कठोर दंड करावा. लोकप्रतिनिधींच्या निधीचा वापर सोयीसुविधांसाठी करावा, सुशोभिकरणासाठी नको. पाणी, रस्ते, कचऱ्याच्या तक्रारींसाठी ऑनलाईन सुविधा हवी.

---

# घाटकोपर होर्डिंग्जप्रकरणी दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा ; विरोधी पक्षनेतेअंबादास दानवे यांची मागणी



**मुंबई, प्रतिनिधी :** घाटकोपर येथे सोमवारी (दि. १३) संध्याकाळी होर्डिंग्ज पडून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी संबंधित स्थानिक प्रशासनातील दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. घाटकोपर होर्डिंग्ज दुर्घटनास्थळी दानवे यांनी आज (दि. १४) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते.

घाटकोपर होर्डिंग्ज दुर्घटनास्थळी (चींलरळ केरीवळपस उेश्रश्ररींश) भेट दिल्यावर अंबादास दानवे यांनी दुर्घटनेत जखमी झालेल्या रुग्णांची राजावाडी रुग्णालयात भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच रुग्णांवर योग्य ते उपचार होत आहेत की नाही याबाबत रुग्णालय प्रशासनाकडून माहिती घेतली.

सरकारने २०२२ ला होर्डिंग्ज धोरण आणले मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दानवे यांनी म्हटले. अशा दुर्घटना टाळण्यासाठी होर्डिंग्ज धोरणात नियमावली बनविण्यात आली असल्यामुळे या होर्डिंग्ज धोरणाची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे असे दानवे म्हणाले.

तसेच या घटनेला जबाबदार असलेल्या स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. तसेच या घटनेतील दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून यातील मृत, जखमी तसेच ज्यांच्या गाड्यांचे नुकसान झाले या सर्वांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. होर्डिंग्ज धोरणानुसार राज्यातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणीही दानवे यांनी केली.

## सेन्सेक्स ३२८ अंकांनी वाढून बंद, निफ्टी २२,२०० वर

**मुंबई, प्रतिनिधी :** भारतीय शेअर बाजारातील सेन्सेक्स आणि निफ्टी मंगळवारी (दि.१४) सलग तिसऱ्या सत्रात तेजीत बंद झाले. बाजारात सर्वाधिक तेजी ऑटो, मेटल आणि एनर्जी क्षेत्रातील शेअर्समध्ये राहिली. सेन्सेक्स आजच्या ट्रेडिंग सत्रात ५०० अंकांनी वाढला. त्यानंतर तो ३२८ अंकांच्या वाढीसह ७३,१०४ वर स्थिरावला. तर निफ्टी ११३ अंकांनी वाढून २२,२१७ वर बंद झाला.

लोकसभा निवडणुकीदरम्यान गेल्या काही दिवसांत शेअर बाजारात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. एकूणच गुंतवणूकदारांनी 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली होती. पण गेल्या तीन सत्रांत बाजार घसरणीतून सावरला.

बीएसई मिडकॅप १.१ टक्के आणि स्मॉलकॅप १.७ टक्क्यांनी वाढला. क्षेत्रीय निर्देशांकात निफ्टी मेटल टॉप गेनर राहिला. हा निर्देशांक २.७७ टक्क्यांनी वाढला. त्यानंतर निफ्टी ऑटो आणि ऑइल अँड गॅस प्रत्येकी १.८ टक्क्यांनी वाढले.

# शहरातील होर्डिंगचे नव्याने स्ट्रक्चरल ऑडिट करा : जिल्हाधिकाऱ्यांचे पिंपरी मनपाला आदेश

**पिंपरी, प्रतिनिधी :** मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेची पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील होर्डिंगचे नव्याने स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्या. अनधिकृत होर्डिंग्ज धारकास नोटीस बजावा. नोटीस बजावून काय कारवाई केली याचा सविस्तर अहवाल सादर करा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत.

मुंबईत झालेल्या वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथील महाकाय लोखंडी जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळला. या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. १४० बाय १४० चौरस फुट फलकाची बेकायदेशीरपणे लांबी रुंदी वाढवण्यात आली. वादळी वा-यासह झालेल्या पावसात हा महाकाय फलक जवळील पेट्रोल पंपावर कोसळला. त्याखाली शंभरहून अधिक नागरिक सापडले. तर, ७४ जण जखमी झाले आहेत.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी महापालिका प्रशासनाला आदेश दिले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार सोसाट्याचा वारा, अवकाळी पाऊस व नजीकच्या मान्सुनच्या हंगामात पडणाऱ्या पावसाची शक्यता विचारात घेऊन जीवित आणि मालमत्ता हानी होऊन



वाहतुकीस अडथळा होऊ नये, याकरिता परवानगी देण्यात आलेल्या सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट नव्याने करुन घेण्यास संबंधित होर्डिंगधारकास कळवावे.

त्याप्रमाणे ऑडीट केल्याचा दाखला १५ दिवसात सादर करण्यास सांगावे. महापालिका हद्दीतील स्ट्रक्चरल ऑडीट न केलेले सर्व होर्डिंग अनधिकृत समजून होर्डिंग धारकास नोटीस द्यावी. होर्डिंग तात्काळ काढून टाकण्याची कार्यवाही करावी. तसेच, सर्व अनधिकृत होर्डिंगवर सक्त कारवाई करण्यात यावी.

त्यामध्ये प्रामुख्याने धोकादायक, वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या होर्डिंगवर तातडीने कारवाई करावी. नव्याने स्ट्रक्चरल ऑडीट केल्याचे प्रमाणित दाखले सादर करावेत. यापूर्वी स्ट्रक्चरल ऑडीट न केलेल्या होर्डिंग धारकांना नोटीस देऊन त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, याचा देखील अहवाल जिल्हाधिकारी यांनी मागवून घेतला आहे.

> अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या अनेक होर्डिंग्जवर यापूर्वीच निष्काशनाची कारवाई करण्यात आलेली आहे. सध्या धोकायदायक स्थितीतील एकही होर्डिंग्ज शहरात नाही. बेकायदेशीर होर्डिंग्ज, फलक, फ्लेक्स उभारणा-या जागा मालकांना अथवा संस्थांना वेळोवेळी नोटीसा देऊन त्यांच्यावर कारवाई करणे सुरुच आहे.
>
> **– संदीप खोत, उपायुक्त, आकाशचिन्ह परवाना विभाग**

## खड्डे बुजवले मात्र, खडी उचलणार तरी कोण?



**पिंपरी, प्रतिनिधी :** तळवडे येथील त्रिवेणीनगर हा रस्ता नियमित वर्दळीचा परिसर आहे. त्यामुळे येथे वाहतूक देखील मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे अपघात, आणि वाहतूक कोंडी लोकांच्या सवयीची झाली आहे. मात्र, गेल्याकाही दिवसांपूर्वी हुमा बेकरी जवळील रस्त्यावर रस्ते खोदाईचे काम करण्यात आले होते. मात्र, काम झाल्यानंतर येथील खडी उचलण्यात आलेली नसल्याने वाहने घसरून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे असे अर्धवट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि ठेकेरांना दंड आकारण्याची मागणी रुपीनगर येथील नागरिकांनी केली आहे.

## महिला फायरमन भरतीत उंची, वजन अहर्तेमध्ये बदल

**पिंपरी, प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील अग्निशमन विमोचक, फायरमन रेस्क्युअर या गट ड संवर्गातील महिलांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांकरिता उंची व वजनाच्या अहर्तेध्ये बदल करण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या अग्निशमन सेवा संचालनालयाची सुधारित अहर्ता या पदांकरिता लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सुधारित अहर्तेनुसार पत्र ठरू शकणार्या महिला उमेदवारांना या पदाकरिता अर्ज करता येणार आहे.

पिपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने अग्निशमन विभागातील अग्निशमन विमोचक, फायरमन रेस्क्युअर या गट ड संवर्गातीलएकून ४३ रिक्त पदांकरिता सरळसेवा भरतीनुसार उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यापैकी ३३ टक्के महिला आरक्षणाच्या १३ जागा महिला प्रवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

त्याकरिता १६ मार्च २०२३ रोजी वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २६ मार्चपासून ऑनलाइन पद्धती-ने या पदांकरिता र्ज मागविले आहेत. या जाहिरातीनुसार महिला प्रवर्गातून या पदाकरिता अर्ज करणार्या उमेदवाराची किमान उंची १६२ सें.मी. व वजन किमान ५० किलो असणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.



दरम्यान, राज्य सरकारच्या मुंबई येथील अग्निशमन सेवा संचालनालयाच्या वतीने पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला या पदभरतीबाबत ३० एप्रिल २०२४ रोजी लेखी पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये या पदभरतीचा उल्लेख करून,अग्निसमन विभागात अग्निशमन विमोचक या पदाकरिता महिला उमेदवारांची किमान उंचीं १६२ सेंटीमीटरऐवजी १५७ सेंटीमीटर आणि किमान वजन ४६ किलो ग्रॅम असावे असा उल्लेख करत, या पदभरतीला हे सुधारित बदल लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, या अग्निशमन सेवा संचालनालयच्या पत्रा-ची दखल गेत, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या पदभरतीबाबत ८ मे २०२४ रोजी परिपत्रक काढत, नवे बदल लागू केले आहेत. त्यामुळे आता नव्या सुधारित नियमावलीनुसार पदभरतीकरिता पात्र महिला उमेदवारांना अर्ज दाखल करता येणे शक्य होणार आहे.

**अर्ज करण्यासाठी शेवटचे दोन दिवस**

अग्निशमन विमोचक या पदाकरिता महापालिकेने ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. त्याकरिता १७ मे २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार या सुधारित नियमावलीनुसार महिला उमेदवार या पदाकरिता अर्ज करु शकणार ाहेत. त्याकरिता आता शेवटचे दोन दिवस बाकी आहेत.

**कमी उंची व वजनाच्या महिला उउमेदवारांना दिलासा**

अग्निशमन विमोचक या पदभरतीकरिता सुधारित नियमावली लागू करण्यात आल्याने कमी वजन व उंचीच्या अनके महिला उमेदवारांना अर्ज करता येणे शक्य नव्हते. मात्र, सुधारित नियमावलीनुसार हे महिला उमेदवारदेखील अर्ज भरण्यास पात्र ठरल्या आहेत. याचा या उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## आकुर्डी परिसरात तब्बल दहा तास बत्ती गुल

**पिंपरी, प्रतिनिधी :** आकुर्डी परिसरात मंगळवारी (ता. १४) तब्बल दहा तास वीजपुरवठा खंडित झाला. भूमिगत केबलमधील तांत्रिक बिघाडामुळे ही समस्या उद्भवली असल्याचे 'महावितरण'ने म्हटले आहे.

महिन्याभरात ही दुसऱ्यांदा समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील व्यापाऱ्यांचे नुकसान होत असून स्थानिक नागरिकही त्रस्त झाले आहेत.

आकुर्डीतील म्हाळसाकांत चौकाजवळील भालेराव हॉस्पिटल परिसरात महावितरणच्या वतीने भूमिगत केबलच्या देखभाल-दुरूस्तीची कामे सुरू आहेत.

ही कामे सुरू असताना सातत्याने काही तांत्रिक बिघाडामुळे या परिसरात वीज पुरवठा खंडित होत आहे. या महिन्यात दोन वेळा अशा घटना घडल्या.

मंगळवारी (ता. १४) देखील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागला. भूमिगत केबलमधील तांत्रिक बिघाडामुळे सकाळी आठ वाजता वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर सायंकाळी सहा वाजता तो सुरळीत झाला. दहा तास ही समस्या निर्माण झाल्याने या परिसरातील व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सातत्याने या परिसरात समस्या निर्माण होत आहेत. याबाबत स्थानिक नागरिकांनी महावितरण कार्यालयाकडे तक्रारी केल्या.

**मागणी वाढल्याने विद्युत तारांवर जादा भार**

उन्हाळ्यात वीजेचा अधिक वापर वाढला आहे. त्यामुळे विद्युत तारांवर जादा भार येत आहे. त्यामुळे, या अडचणी निर्माण होत असल्याचे 'महावितरण'कडून सांगण्यात येत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

## इंद्रायणीत रसायणमिश्रित पाणी सोडणाऱ्यांवर कारवाई

**पिंपरी, प्रतिनिधी :** इंद्रायणी नदीपात्रात रसायणमिश्रित पाणी सोडल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिकेने कुदळवाडीतील एका भंगार व्यावसायिकावर कारवाई केली आहे. नदी प्रदूषणाला कारणीभूत ठरल्याप्रकरणी पर्यावरण विभागाकडून भंगार गोदाम मालकावर पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला असून गोदाम सील करण्यात आले आहे.

रेहान एंटरप्रायजेसचे मालक अब्दुल मलिक अब्दुल जब्बार खान (रा. जाधववाडी, चिखली) याच्याविरोधात चिखली पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम २७८, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ कलम १५, महापालिका अधिनियम ३७६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



खान याचे कुदळवाडी येथे भंगारचे गोदाम आहे. त्याच्या गोदामातून रसायनयुक्त हिरवे लाल रंगाचे सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळत असल्याचा प्रकार उघडकीस आला.

याबाबत महापालिकेकडून पाहणी करून चौकशी करण्यात आली. महापालिकेने याप्रकरणाची गांभीर्याने दखल घेत भंगार गोदाम सील करुन गोदाम मालकावर गुन्हा नोंदवला आहे.

पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, उप अभियंता योगेश आल्हाट यांच्या नियंत्रणखाली आरोग्य निरीक्षक अमोल गोरखे व गोरक्षनाथ कर्पे एमपीडब्लु यांनी मेस्को व एमसेफ जवान पथक यांच्यासह कारवाई केली आहे.

### निवडक

## 'फाटलेल्या बॅनरचा लोखंडी सांगाडे काढा'

**तळेगाव दाभाडे (स्टेशन) :** येथील मारुती मंदिर चौकासमोरील इमारतीवर असलेला जाहिरातीचा बॅनर सोमवारी (ता. १३) सायंकाळी जोरदार वाऱ्यामुळे फाटला. त्याचा लोखंडी सांगाडा रस्त्यावर पडण्याचा धोका निर्माण झाल्याने तो त्वरित काढावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सध्या रोज सायंकाळी ढगाळ वातावरण निर्माण होऊन जोरदार वारे वाहत आहे. सोमवारी येथील बॅनरच्याखाली असलेला दुकानाचा लोखंडी बोर्ड वाऱ्यामुळे रस्त्यावर पडला. सुदैवाने त्यावेळी तेथून कोणी जात नव्हते त्यामुळे पुढील दुर्घटना टळली. अवकाळी पाऊस व वाऱ्यामुळे जाहिरातीचे लोखंडी सांगाडे कोसळून जीवितहानी झाल्याच्या घटना सध्या घडत आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी तळेगाव व स्टेशन भागातील धोकादायक जाहिरातींचे लोखंडी सांगाडे काढावेत, अशी मागणी केली जात आहे.

## ग्रेडसेपरेटरमधून बाहेर पडण्यासाठीचा रस्ता बंद

पिंपरी : पुणे-मुंबई महामार्गावर निगडी येथे ग्रेडसेपरेटरमधून बाहेर पडण्यासाठीचा रस्ता बंद करण्यात आला आहे. परिणामी, ग्रेड सेपरेटरमधून बाहेर न पडता वाहनचालकांना उड्डाणपुलावरून पुढे जाऊन वळसा मारून निगडी चौकात यावे लागत आहे.

निगडी येथे दिवंगत मधुकर पवळे उड्डाणपूल सुरू होण्यापूर्वी ग्रेडसेपरेटरमधून बाहेर पडण्यासाठी रस्ता आहे. या रस्त्यावर मध्यंतरी पुलापासून सुमारे २५ फूट खोदकाम करण्यात आले होते. अनेक वाहनचालक तेथून बीआरटी मार्गातून मागे येऊन वळतात. निगडी चौकात जाणाऱ्या वाहनचालकांची कुचंबणा झाली आहे. बीआरटी मार्गातून पुन्हा सेवा रस्त्यावर उलट्या दिशेने येतात. अपघात होण्याची शक्यता आहे. याला जबाबदार कोण? असा सवाल चालकांनी उपस्थित केला आहे.

## पत्नीला शिवीगाळ केल्याने मित्राची डोक्यात सिमेंट ब्लॉक मारून हत्या; गुंडा विरोधी पथकाने आरोपीला थेरगावातून केले अटक

**पिंपरी, प्रतिनिधी :** पत्नीला अश्लील शिवीगाळ केल्याने मित्राची हत्या केल्याची घटना घडली आहे. पिंपरी-चिंचवडच्या गुंडा विरोधी पथकाने आरोपीला अटक केली आहे. केतन निवृत्ती कोंढाळकर वय- २८ असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. संदीप उर्फ दशरथ देशमाने वय- २५ असे हत्या केलेल्या आरोपीचे नाव आहे. संदीपने केतनच्या डोक्यात सिमेंटच्या गट्टूने घाव घालून हत्या केली. शहरातील



मोशी भागात अनोळखी व्यक्तीची हत्या झाल्याचं समोर आलं होतं. एमआयडीसी भोसरी पोलीस आणि गुंडा विरोधी पथक आरोपींचा शोध घेत होत. याच दरम्यान हत्या झालेल्या तरुणाचे नाव हे केतन निवृत्ती कोंढाळकर असल्याचं निष्पन्न झाले. दिवसभर तो कोणाशी बोलला याच तांत्रिक विश्लेषण करून गुंडा विरोधी पथक आरोपीपर्यंत पोहोचले. आरोपी संदीप उर्फ दशरथ देशमानेला थेरगाव येथील मैत्रिणीच्या घरातून अटक केली. आरोपी संदीपकडे पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीत हत्या झालेल्या केतन कोंढाळकर याने संदीपच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ केली होती. याच रागातून संदीपने केतनची डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून जीवे ठार मारले. या सर्व घटनेप्रकरणी आरोपी संदीपच्या विरोधात एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात २४६/२०२४ भा.द.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सततच्या पावसामुळे म्हाडा कॉलनीत स्लॅब कोसळला, म्हाडातील घरांच्या दुरवस्थेमुळे नागरिक भयभीत

**विश्रांतवाडी, प्रतिनिधी:** दोन ते तीन दिवसांपासून सतत सायंकाळी होत असलेल्या पावसामुळे येरवडा येथील महाराष्ट्र हौसिंग बोर्डमधील आदित्यनारायण सहकारी गृहरचना संस्था मर्यादित एम २४ या इमारतीमधील सी विंगमध्ये छताचा काही भाग कोसळला. यात जीवितहानी झालेली नसली तरी इमारत धोकादायक अवस्थेत असल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

प्रत्येकाच्या जिवावर बेतेल अशीच घटना घडलेली आहे. यासंदर्भात येथील रहिवासी व सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत खंडाळे म्हणाले की पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू होऊन गेल्या चार-पाच वर्षे होत आलेले आहेत. म्हाडाच्या अधिकार्यांनी विकासकाने पैसे भरले की लगेचच ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल असे सांगितले. परंतु काही वैद्यकीय कारणांमुळे त्यांचा चार्ज आत्ताच्या अधिकार्यांच्या हातात दिला.

आत्ताचे अधिकारी यांनी आमच्या इमारतीच्या सभासदांना अंडरटेकींगचा फॉर्म भरून मागितला. तोही आम्ही सर्वांनी भरून दिला. प्रीमियमचा एक हप्ता भरूनही जवळपास एक वर्ष झाले, तरी अजून नाहरकत प्रमाणपत्र मिळाले नाही. आता त्यांनी विकसकाचा करार मागितला असून त्यात शंभर टक्के रहिवाशांचा समावेश असावा, असे त्यांचे म्हणणे आहे. येथील काही लोकांनी आपले फ्लॅट भाड्याने दिलेले आहेत.

तर काही परदेशात राहतात, तर काहीजण इतर राज्यांत राहतात. काही लोकांची तब्येत ठीक नाही. त्यामुळे आम्ही हा करार देऊ शकलो नाही, कारण या सर्व गोष्टींना वेळ लागणार आहे. दरम्यान जर काही दुर्घटना घडल्यास, भूकंप झाल्यास, इमारत कोसळण्याची शक्यता आहे. पहिल्याच पावसामुळे वर पाणी झिरपून स्लॅब कोसळत आहे तर पावसाळ्यातसुद्धा अतिशय बिकट अवस्था असणार आहे.

खालून तळमजल्याच्या प्रत्येकाच्या घरामध्ये घुस लागलेली असून इकडे बुजविले की तिकडून घुस खड्डे करीत असून त्यामुळे इमारतीची अवस्था अतिशय खिळखिळी करून टाकलेली आहे. पुनर्विकास करण्यासाठी एक्कावन्न टक्के, साठ टक्के, सत्तर टक्के अशी सभासदांची जरी संमती असेल तरीही चालेल, असे सर्वांना वाटते आहे.

परंतु डेव्हलपमेंट करार हा शंभर टक्के सभासदांनी करून देणे आवश्यक आहे. तरी म्हाडाच्या अधिकार्यांनी सहकार्य करून ना हरकत प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या संदर्भात म्हाडाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आमच्याकडून प्रक्रिया सुरू असून नियमाप्रमाणे डेव्हलपमेंट करार होऊन विकसकाकडून प्रिमियम येणे बाकी आहे. त्यामुळे नाहरकत पत्र देणे राहिले आहे. या सोसायटी आणि विकसक यांच्यातील अंतर्गत गोष्टी आहेत. त्यामुळे आमच्याकडून कोणतेही काम रखडले नाही.



# सांगलीसह पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, सोलापूर रेल्वे स्थानके आरडीएक्सने उडविण्याची धमकी



**सांगली प्रतिनिधी :**
रेल्वे स्थानकांत बॉम्बस्फोटाची धमकी देणाऱ्या अज्ञाताविरोधात शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला. स्फोटाच्या धमकीने सोमवारी रात्री जिल्हा पोलिस दलाची बरीच धावपळ झाली.

रात्री सव्वाआठ वाजता शहर पोलिसांना स्फोटाच्या धमकीचा फोन आला. अज्ञाताने सांगितले की मी दहशतवादी आहे. माझ्यासोबत आणखी पाच व्यक्ती आहेत. त्या व्यक्ती मुंबई, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे येथे पोहोचल्या आहेत. आरडीएक्सने या स्थानकांत स्फोट करणार आहेत. या धमकीची दखल घेत पोलिस अधिक्षक संदीप घुगे, अतिरिक्त अधिक्षक रितू खोकर यांच्यासह पोलिस पथके सांगली व मिरज स्थानकांत पोहोचली.

जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांना संदेश देऊन मुख्य रस्त्यांवर नाकाबंदी करण्यात आली. संशयित वाहनांची झडती घेण्यात आली. रुग्णवाहिका, अग्नीशमन यंत्रणा, खासगी व सरकारी रुग्णालये यांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. यादरम्यान, बॉम्बशोध पथकाने सांगली व मिरज स्थानकांत कसून तपासणी केली. त्यावेळी कोणतीही अनुचित बाब आढळली नाही. या मोहिमेत सांगली, मिरजेतील पोलिस अधिकारी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग, दंगलविरोधी पथक, दहशतवादविरोधी पथक आदींनी सहभाग घेतला.

दरम्यान, सांगली व मिरजेतील गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे निरिक्षक सतीश शिंदे यांनी सांगितले की, धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरु आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.

## निवडक

### सर्व्हर डाऊनमुळे सात बारा ठप्प ! सोमवारपासून निघत नाहीत उतारे

**सोलापूर** :गुळवंची, पुढारी वृत्तसेवा: सोलापूर जिल्ह्यासह राज्यात महाभूमिलेख सर्व्हरमधील बिघाडामुळे सोमवारपासून (दि.१३) ऑनलाइन सात-बारा उतारा देणे बंद आहे. सात-बारा उतारा मागणीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. शेतकऱ्यांना विविध संस्था व बँकाकडून घेतलेले कर्ज नूतनीकरण करावयाचे असल्यास शेतकऱ्यांना वारस नोंद, शेती वाटपाची नोंद, शेतकऱ्यांच्या विविध योजना, शेतीच्या मोजणीसाठी, शेती खरेदी विक्री करण्यासाठी डिजिटल सात बाराची गरज भासते. मात्र सर्व्हर डाऊनमुळे शेतकऱ्यांचा खेळखंडोबा झाला आहे. सर्व्हर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रांवर डिजिटल सात-बारा मिळत नसल्याने, सात-बारा मिळवण्यासाठी शेतकरी पूर्वीप्रमाणेच संबंधित गावच्या तलाठ्यांकडे धाव घेत आहेत. तलाठ्यांकडून लॅपटॉप द्वारे सात-बाराची प्रिंट उपलब्ध करून दिली जात होती. परंतु तलाठी यांना देखील उतारे डाउनलोड करण्यासाठी तांत्रिक अडचणी असल्याने उतारे निघत नसल्याने शेतकऱ्यांना उताऱ्याविनाच माघारी परतावे लागत आहे.शेतकरी विविध कामासाठी सात-बारा मिळविण्यासाठी जिल्ह्यातील सेतू केंद्रांवर गर्दी करतात. परंतु सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने शेतकऱ्यांना सात बारा मिळण्यात अडचणी येत आहेत. सात-बारा डिजिटल झाला असला तरी, त्यासाठी मात्र शेतकऱ्यांना हेलपाटे सहन करावे लागत आहेत.शेतकऱ्यांना उतारे मिळवण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### मोदींच्या सभास्थळी पोलिसांचा फौजफाटा, दोन हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांचा खडा पहारा



**नाशिक :** नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदार संघातील निवडणूकीमुळे राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांच्या स्टार प्रचारकांनी प्रचारात सक्रीय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसह राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शरद पवार व शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे यांच्या बुधवारी (दि. १५) जिल्ह्यात जाहिर सभा होणार आहेत. त्यामुळे पिंपळगाव बसवंत, चांडवड आणि नाशिक शहरात सभेभोवती पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. खबरदारी म्हणून जिल्ह्यातील आंदोलकांना नजरकैदेत ठेवले जात आहे किंवा नोटीस बजावण्यात येत आहेत. नाशिक ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत पिंपळगाव बसवंत येथे बुधवारी पंतप्रधान मोदी यांची सभा होणार आहे. तर शरद पवार यांची चांदवड आणि उद्धव ठाकरे यांची नाशिक शहरात गोल्फ क्लब मैदानात सभा होत आहे. मोदींच्या सभेसाठी ग्रामीण पोलिसांनी सुमारे दोन हजार पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात केला आहे. शहरातून दोनशे अंमलदार, पन्नास अधिकारी व एक उपायुक्तांची अतिरिक्त कुमकही देण्यात आली आहे. यासह राज्य राखीव पोलिस दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, विशेष सुरक्षा दलाचे (एसपीजी) कमांडो यांची पथके तैनात राहणार आहेत. दरम्यान, मोदी, पवार आणि ठाकरे यांच्या सभेभोवती सशस्त्र पोलिसांचा वेढा आहे. तसेच आज बुधवारी (दि. १५) पासून मतदान प्रक्रिया सोमवारी (दि. २०) पूर्ण होईपर्यंत शहरासह ग्रामीण हद्दीत पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त नेमण्यात आला आहे. परजिल्ह्यातील सुमारे अडीच हजार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची कुमक शुक्रवारी (दि.१७) दाखल होणार आहे. त्यासाठीही शहर व ग्रामीण पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन पूर्ण केले आहे.

# वृक्षतोड प्रकरण भोवले; कोल्हापूर महानगरपालिकेचे पर्यावरण अधिकारी, मुकादम निलंबित



**कोल्हापूर प्रतिनिधी :**
रंकाळा तलावाजवळील पद्माराजे उद्यानातील वृक्षतोड प्रकरण महानगरपालिका पर्यावरण अभियंता तथा प्रभारी उद्यान अधीक्षक समीर व्याघ्रांबरे व प्रभारी मुकादम अमृत गजानन शिंदे यांच्या चांगलेच अंगलट आले. प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांनी सोमवारी उशिरा या दोघांनाही वृक्षतोड प्रकरणी निलंबित केले.रंकाळा तलावाला लागून असलेल्या पद्माराजे उद्यान परिसरातील नागरिक तसेच संघटनांनी उद्यानातील दोन रबर जातीचे वृक्ष तसेच इतर वृक्षांच्या फांद्या तोडाव्यात अशी मागणी दि. २४ जानेवारी रोजी एका अर्जाद्वारे केली होती. कोणी मागणी केली म्हणून वृक्ष तोडता येत नाहीत, म्हणून पर्यावरण अभियंता तथा प्रभारी उद्यान अधीक्षक समीर व्याघ्रांबरे यांनी महापालिकेतील वृक्ष प्राधिकरण समिती समोर हा अर्ज प्रस्तावाच्या माध्यमातून मंजूरी करिता ठेवला होता. वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक दि. २६ फेब्रुवारी रोजी पार पडली. या बैठकीत फाद्या तोडण्यास मान्यता देण्यात आली, परंतु वृक्ष तोडीची मागणी अमान्य करण्यात आली होती.

वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही न ठेवता समीर व्याघ्रांबरे व प्रभारी मुकादम अमृत शिंदे यांनी बुम, कटरच्या सहाय्याने दोन रबर जातीचे वृक्ष तसेच अन्य काही वृक्ष बुडक्यासह तोडल्याचे निदर्शनास आले. याबाबत वृत्तपत्रातून वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर त्याची चौकशी करण्यात आली.

वृत्तपत्रातून जेंव्हा वृक्षतोडीची चर्चा झाली तेंव्हा व्याघ्रांबरे यांनी वृक्ष प्राधिकरण समितीच्या मान्यतेनेच ही वृक्षतोड झाल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे समितीवरील अशासकीय सदस्य दुखावले होते.

आम्ही वृक्ष तोडण्यास मान्यता दिली नाही, केवळ फांद्या तोडण्यास मान्यता दिल्याचा खुलासाही अशासकीय सदस्यांनी केला होता. या सगळ्या प्रकरणाला व्याघ्रांबरे आणि समिती सदस्यामधील वादही कारणीभूत असल्याची चर्चा आहे. वृक्षतोडीची प्राथमिक चौकशी झाल्यानंतर प्रशासक मंजूरलक्ष्मी यांनी सोमवारी सायंकाळी उशीरा ही निलंबनाची कारवाई केली. तसेच त्यांच्या विभागीय चौकशीचे आदेशही दिले आहेत. निलंबित कालावधीत दोघांनी मुख्य कार्यालयात रोज उपायुक्त कार्यालयात हजेरी देण्याची आहे.

# कांदाप्रश्नी उत्पादक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांच्या नोटिसा!



**नाशिक, प्रतिनिधी :**
महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बुधवारी (ता. १५) पिंपळगाव बसवंत येथे जाहीर सभा होत आहे. या वेळी कांदाप्रश्नी जिल्ह्यातील संघटना, शेतकऱ्यांकडून आंदोलन होण्याची शक्यता गृहित धरून ग्रामीण पोलिसांकडून जिल्ह्यातील कांदा उत्पादक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना आज नोटिसा बजावण्यात आल्या.

पंतप्रधान मोदी यांच्या सभेवेळी कांदा उत्पादक संघटना व शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे ग्रामीण पोलिस अधीक्षकांच्या आदेशान्वये ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत कांदा उत्पादक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना कलम १४९ अन्वये व जमावबंदीचा आदेशाचे उल्लंघन करू नये म्हणून मंगळवारी (ता. १४) नोटिसा बजावण्यात आल्या.

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांना सिन्नर एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यशवंत बाविस्कर यांनी नोटीस बजावली.

याचप्रमाणे जिल्ह्यातील कांदा उत्पादक संघटनेसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

# येवला तालुक्यात वादळी पावसाने मोठे नुकसान



**येवला, प्रतिनिधी :**
तालुक्यात मंगळवारी (दि. १४) संध्याकाळी झालेल्या वळवाच्या वादळी पावसाने शेतकरी वर्गाची चांगलीच धाव-पळ झाली. तालुक्यातील साताळी येथील विशाल काळे यांचा गोठा वादळी वाऱ्याच्या प्रकोपामुळे उध्वस्त झाला. तर बापू राजगुरू यांच्या ट्रॅक्टरवर झाड पडल्याने ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले आहे. कमी पाऊस मात्र झोरदार वाऱ्याने ठिकठिकाणी नुकसान झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# महायुतीकडून दोन हजार कोटींचे वाटप; रोहित पवार यांचा गंभीर आरोप

**नाशिक, प्रतिनिधी :**
लोकसभा निवडणुकीत महायुती व मित्र पक्षांकडून मोठ्या निवडणुकीत पैशाचा वाटप सुरू आहे. बारामती, अहमदनगरनंतर आता नाशिकमध्ये महायुती पैशाचे वाटप करत आहे. महायुती राज्यात दोन हजार कोटी रुपये खर्च करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला.

याबाबतचे अनुभव दोन टप्यांतील निवडणुकांमध्ये दिसले. बारामतीत १५० कोटी रुपये खर्च करण्यात आला. पोलिस व्हॅन, रुग्णवाहिका, टँकरमधून पैसा आणल्याचाही दावा त्यांनी यावेळी केला. प्रचार दौऱ्यानिमित्त नाशिकमध्ये आलेले आमदार रोहित पवार यांनी



पत्रकारांशी संवाद साधला.

पवार म्हणाले की, अहमदनगर लोकसभा मतदारसंघात उन्हाळ्यातही पैशांची धुवांधार बरसात झाली आहे. या संदर्भात एका पोस्टच्या माध्यमातून व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांनी नाशिकमध्ये पैशांच्या बॅगा भरून आणल्याचा आरोप केला होता. त्यावर पवार म्हणाले की, मुख्यमंत्री मुक्कामी राहणार नव्हते.

आता फाईल सही करू शकत नाहीत. असे असाताना ९ बॅगा कशासाठी आणल्या, हा प्रश्न उपस्थित होतो. नाशिक आणि दिंडोरीचे महाविकास आघाडीचे उमेदवार सामान्य आहेत. महायुतीचे उमेदवार बलाढ्य आहेत. त्यामुळे नाशिक, दिंडोरीतही पैसेवाटप होईल, असे त्यांनी सांगितले.

खासदार राऊत यांच्या ८०० कोटींच्या भूसंपादन गैरव्यवहाराच्या आरोपावर बोलताना त्यांनी दोन वर्षांत सरकारने हजारो कोटींचा गैरव्यवहार केला आहे.

आम्ही सत्तेत आल्यानंतर भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांना शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जायला भीती वाटत आहे. सामान्य माणूस धडा शिकवेल, अशी भीती भाजपला आहे. त्यामुळे नाशिकमधील मोदी यांच्या सभेची जागा बदलल्याचा टोला पवार यांनी लगावला.

**मतदानाचा टक्का घसरला**

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विचाराचा फुगा फुटला आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेले राजकारण लोकांना आवडले नाही. सामान्य लोकांचा विश्वास उडाला आहे. त्यामुळे भाजपचा बालेकिल्ला असलेल्या पुण्यात मतदान कमी झाले. भाजपचे मतदार बाहेर न निघाल्याने मताचा टक्का घसरला. मोदी यांच्या अंधभक्तांना तोंड दाखवायला जागा राहिली नाही. परिणामी याचा फायदा महाविकास आघाडीला होणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

**राज्यात महायुतीला १६ ते १८ जागा**

महाराष्ट्रात महायुतीला किती जागा मिळणार, यावर रोहित पवार यांनी भाष्य केले. भारतीय जनता पक्षाला १३ ते १४ जागा, शिवसेनेला (शिंदे) २ ते ३ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) एकही जागा मिळणार नाही. यामुळे महायुतीला राज्यात १६ ते १८ जागा मिळतील, असा दावा पवार यांनी केला.

# जिल्ह्यात स्वच्छतेची मोहिम प्रभावीपणे राबवा : पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**सांगली, प्रतिनिधी :**
टंचाई परिस्थिती उद्भवलेल्या भागातील जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती आढावा बैठकीत दिल्या.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती संदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख, नगर प्रशासन विभागाच्या सह आयुक्त पूनम मेहता, उपयुक्त समीक्षा चंद्राकर, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्यासह जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले, जलसंपदा विभागाने धरणातील पाणीसाठा व उपसा सिंचन योजना मधील पाण्याचे योग्य नियोजन करावे. जिल्ह्यातील दुष्काळी भागातील लोकांना पुरेसे पाणी मिळावे म्हणून उपलब्ध पाण्याचे स्त्रोत निश्चित करावेत.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सादरीकरणाद्वरे जिल्ह्यातील टंचाई परिस्थिती माहिती दिली. जिल्ह्यात सद्यस्थितीत ९८ टँकर सुरू असून यामध्ये जत तालुक्यात ८६, आटपाडी ११ आणि एक टँकर शिराळा तालुक्यात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शासन निकषानुसार दुष्काळ परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या आठ उपाय योजना लागू करण्यात आल्याची माहिती देवून जिल्ह्यात सद्यस्थितीत आवश्यक चारा उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

**माझी वसुंधरा अभियानाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा**

गावे व शहरे स्वच्छ व्हावीत, लोकांना स्वच्छतेची सवय जडावी, नागरिकांनी स्वच्छतेची जीवन पध्दती अंगीकारावी यासाठी जिल्ह्यात स्वच्छतेची मोहिम प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज दिल्या.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी माझी वसुंधरा अभियानातील कामांचा आढावा घेतला. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, अपर जिल्हाधिकारी डॉ.




स्वाती देशमुख, नगर प्रशासन विभागाच्या सह आयुक्त पूनम मेहता, उपयुक्त समीक्षा चंद्राकर, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्यासह जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी, गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी उपस्थित होते. डॉ. पुलकुंडवार म्हणाले, नागरिकांना स्वच्छतेची सवय लागणे महत्वाचे आहे. स्वच्छतेमुळे पर्यावरण रक्षण व संवर्धन होते. माझी वसुंधरा अभियानात भूमि, जल, वायू, अग्नी आणि आकाश या पाच घटकांच्या माध्यमातून स्वच्छतेचे काम होत आहे. यामध्ये महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींनी सक्रीय सहभाग घेवून आपला भाग स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहोचविण्यासाठी शालेय विद्यार्थी महत्वाची भूमिका बजावतो. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात स्वच्छतेचा संदेश पोहचवावा. स्वच्छतेसाठी ग्रामस्तरापर्यंत मजबूत टीम असावी. तहसिलदार, गटविकास अधिकाऱ्यांनी स्वच्छतेसंदर्भात नियमित बैठका घ्याव्यात. जिल्हास्तरावरून त्यांना योग्य ते मार्गदर्शन व मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, जिल्हा प्रशासन अधिकारी ज्ञानेश्वर ढेरे यांनी जिल्ह्यात त्यांच्या विभागामार्फत माझी वसुंधरा अभियानात सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.



# लोकसभेचा महासंग्राम २०२४



## कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या दरबारात भाविकांची गर्दी ; उन्हाळी सुट्ट्या अन् निवडणूकही संपली



**धाराशिव प्रतिनिधी :**
राज्यातील बहुतांश भागातील लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण झाला आहे. सध्या सुरू असलेल्या उन्हाळी सुट्ट्या आणि निवडणूक संपल्यामुळे बुधवारी श्री तुळजाभवानी देवीचा दरबार भक्तांच्या गर्दीने फुलून गेला होता. देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. संपूर्ण मंदिर परिसर, महाद्वार रोड, भवानी रोड गर्दीने अक्षरशः गजबजून गेला होता.

मंगळवारी मध्यरात्री एकनंतर महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीचे मंदिर उघडण्यात आले. चरणतीर्थ, धार्मिक विधी झाल्यानंतर भाविकांना देवीदर्शनासाठी मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश देण्यात आला. भल्या पहाटे जगदंबेच्या दर्शनासाठी तुळजापूर नगरीत दाखल झालेल्या भाविकांनी मोठ्या श्रद्धेने पहाटेच्या सुमारास श्री कल्लोळ तीर्थामध्ये स्नानासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. कल्लोळ तिर्थप्रामाणेच मंदिरातील गोमुख तीर्थावरही भाविकांची तुडुंब गर्दी होती. धर्मदर्शन, मुखदर्शन घेण्यासाठी श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी मंगळवारी दिवसभर जगदंबेचे मंदिर आणि परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून आला होता.

भाविकांनी मोठ्या रांगा लावल्या होत्या. तसेच अभिषेकासाठी देखील भाविकांची मोठी गर्दी होती. तुळजाभवानी मंदिर गर्दीच्या दिवशी रात्री एक वाजता उघडेले जाते. मंदिर प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे भाविकांची मोठी गर्दी होऊनही सर्वांना सुरळीत व वेळेत दर्शन घेता आले. मंदिर परिसरातील हजारोच्या संख्येने उपस्थित भाविक आई राजा उदे-उदे असा जयघोष करीत मोठ्या श्रद्धेने तुळजाभवानी देवीच्या चरणी नतमस्तक झाले. या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

उन्हाळी सुट्ट्या आणि बहुतांश भागातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारोच्या संख्येने भाविक मंगळवारी सायंकाळीच शहरात दाखल झाले होते. भाविकांची संख्या लक्षात घेऊन प्रशासनाच्या वतीने रात्री १ वाजण्याच्या सुमारास मंदिर उघडले. त्यामुळे भाविकांची गैरसोय टळली.

## सरकार आमचं, महापालिका आमची, उद्धव ठाकरेंचा काय संबंध?; होर्डिंग दुर्घटनेवरून छगन भुजबळांनी सुनावलं

**वसई, प्रतिनिधी :**
मुंबईमध्ये सोमवारी झालेल्या वादळामुळे आणि अवकाळी पावसाने अवघ्या मुंबईकरांची दाणादाण उडाली. तसेच घाटकोपरमध्ये एक भलेमोठे होर्डिंग कोसळून १४ जणांचा मृत्यू झाला. तर ८५ जण या घटनेत जखमी झाले आहेत. या घाटकोपर दुर्घटनेतील होर्डिंग कंपनीचे मालक भावेश भिंडे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तसेच भावेश भिंडे बेपत्ता झाल्याची माहिती सांगितली जात आहे. यानंतर भाजपाचे नेते राम कदम यांनी भावेश भिंडे आणि उद्धव ठाकरे यांचे फोटो एक्सवर शेअर करत टीका केली.

तसेच किरीट सोमय्या यांनीही उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला होता. आता या होर्डिंगच्या घटनेवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांची बाजू घेतली आहे. सरकार आमचं, महापालिका आमची, मग उद्धव ठाकरे यांचा काय संबंध?, असा सवाल भुजबळांनी भाजपाच्या नेत्यांना केला आहे. ते माध्यमांशी बोलत होते.



**छगन भुजबळ काय म्हणाले?**

घाटकोपरमध्ये काल जी होर्डिंगची घडना घडली, त्यामध्ये दुर्देवी मृत्यू झाले. वांद्रा येथून सांताक्रुज जात असताना मोठमोठे होर्डिंग लावलेले आहेत. अनेक ठिकाणी तर ते रस्त्याच्या मध्येही आलेले आहेत. त्याचे वजन मोठ्या प्रमाणात असते. त्यातील काही बेकायदेशीर असतात. याबाबत तक्रारीही दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे या सर्व होर्डिंगची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माझी आहे. ही चौकशी महानगरपालिकांनी केली पाहिजे, असं मत छगन भुजबळ यांनी मांडलं.

असा प्रकारचे होर्डिंग असले की काही सांगतात बेकायदेशीर आहे, नोटीस दिलेली आहे. पण बेकायदेशीर असतील तर वेळ न लावता लगेच कारवाई झाली पाहिजे. लोकांचा मृत्यू झाल्यानंतर हे धाव घेतात. आता त्या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यामध्ये त्यांचा काय दोष? तेथून जाणाऱ्या लोकांचा काय गुन्हा आहे? यानंतर सरकार मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना पाच-पाच लाख देईल, पण म्हणजे सगळं संपलं का? आता तरी सर्व होर्डिंगची चौकशी झाली पाहिजे, असं भुजबळ म्हणाले.

**भुजबळांनी घेतली ठाकरेंची बाजू**

आता सरकार आमचं, महापालिका आमचीच, मग उद्धव ठाकरेंचा काय संबंध? जे व्यापारी लोकं असतात ते आमच्याकडे येत असतात. फोटो काढत असतात. आता माझ्याकडे अनेकजण येतात आणि फोटो काढतात. ते कोण आहे हे देखील लक्षात येत नाही. आल्यानंतर आपण त्यांना फोटो काढायला नाही कसे म्हणणार? त्यामुळे फोटोवरून काही तर्क काढणे हे योग्य नाही, असं छगन भुजबळ यावेळी म्हणाले.

---

## निवडक

### महायुती-मविआ यांच्यात सिडकोत संघर्ष, मुकेश शहाणेविरुध्द गुन्हा



**नाशिक :** सिडकोत सोमवारी महायुतीच्या प्रचार फेरीदरम्यान महाविकास आघाडीशी वाद उदभवला. भाजपचे माजी नगरसेवक मुकेश शहाणे विरोधात तक्रारीनंतर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या उत्तम नगर येथील संपर्क कार्याजवळून महायुतीची फेरी जात असता मविआ पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी हातात मशाली घेऊन शंभर खोके एकदम ओकेच्या घोषणा दिल्या.

ला प्रत्युत्तर म्हणून भाजपचे माजी नगरसेवक मुकेश शहाणे यांनी महाविकास आघाडीच्या संपर्क कार्यालयात धाव घेत जाब विचारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ठाकरे गटाचे पदाधिकारी रमेश उघडे यांना म्हणाले की, घरात भाजपचे नगरसेवक असताना मशाल मशाल काय करता? असे म्हणत त्यांच्या हातातील मशाल खाली पाडली. मशाल खाली पडल्याने वातावरण चांगलेच तापले. हा प्रकार ठाकरे गटाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना कळल्यावर त्यांनी अंबड पोलीस ठाण्यात धाव घेतली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप ठाकूर यांच्याकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. तब्बल चार तासानंतर शहाणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. शहाणेवर याआधीच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून नोटीस बजावण्यात आली असल्याचे ठाकूर यांनी सांगितले.

## अमरराजे कदम यांची तुळजापुरच्या विकास प्रश्नासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट



**तुळजापूर, प्रतिनिधी ;**
ठाणे येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची धाराशिव लोकसभेच्या निवडणूकीचा पक्षाचे प्रवक्ते योगेश केदार, जिल्हा सहसंपर्क प्रमुख अमरराजे कदम, उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके व युवासेना उपजिल्हाप्रमुख सुरज कोठावळे यांनी भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी धाराशीव जिल्ह्यातील राजकीय घडामोडीबाबत माहिती दिली. अमरराजे कदम व ज्ञानेश्वर घोडके यांनी धाराशीव लोकसभेत केलेल्या कार्याचा अहवालही दिला. अमरराजे कदम यांनी श्री. तुळजा भवानी मंदिर विकास आराखडासंदर्भात भरीव निधी उपलब्ध केला जावा. तसेच तुळजापूर शहर पर्यटनाच्या दृष्टीने देखील विकसित व्हावा याबाबत चर्चा केली. योगेश केदार यांनी मराठवाडा दुष्काळ व उजनीचे २१ टिएमसी पाण्याबाबत चर्चा केली.

## १० टक्के मराठा आरक्षणाचा काहिच फायदा नाही; मनोज जरांगेंचे ४ जून पासून पुन्हा उपोषण

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मागील काही महिन्यांपासून लढा देणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा बेमुदत उपोषण करणार असल्याचे त्यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितलं. तसेच त्यांच्या उपोषणाची सुरुवात ४ जून रोजी म्हणजेच लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी होईल, अशी माहितीही त्यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे राज्य सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षणाचा मराठा समाजाला कोणताही फायदा होत नसल्याचा आरोपही त्यांनी यावेळी बोलताना केला.

**नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?**

माझा हा लढा मराठा समाजाला न्याय देण्यासाठी आहे. मी ४ जूनपा-



सून पुन्हा बेमुदत उपोषण करणार आहे. मुळात सर्वच पक्षात मराठा समाजाचे नेते आहेत. मराठा कोणताही असला तरी त्याला राज्य सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षणाचा कोणताही फायदा झालेला नाही. यामध्ये भाजपातील गरीब मराठा समाजाच्या मुलांचंही नुकसान झाले आहे. सरकारने १० टक्के आरक्षण दिलं आहे, पण ते अजूनही लागू झालेलं नाही, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

**४ जूनपासून उपोषणाला सुरुवात**

पुढे बोलताना ते म्हणाले, ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल असला, तरी सकाळी ९ वाजता माझ्या उपोषणाची सुरुवात होईल. जनतेचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे. सहा कोटी मराठा समाजाचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे.

**मराठा समाज गावोगावी शांततेत आंदोलन करतील**

दरम्यान, या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला काय आवाहन कराल, असं विचारलं असता, मला आता समाजाला आवाहन करण्याची गरज वाटत नाही. मराठा समाजाला आता सगळं माहिती आहे. एका मुलाप्रमाणे ते माझी काळजी घेतात. माझे उपोषण सुरु झाल्यानंतर मराठा समाज गावोगावी शांततेत आंदोलन करतील, असा मला विश्वास आहे, असे ते म्हणाले.

## बस-कारच्या धडकेत कुटुंबातील तिघांचा मृत्यू, चिमुकला बचावला

**नाशिक:**
नााशिकहून भडगावकडे निघालेल्या कारला नांदगाव नजिक समोरून येणाऱ्या बसने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली. आई आणि भाऊ-बहिण या अपघातात मृत्यूमुखी पडले या अपघातात तीन वर्षीय नातू मात्र बचावला अजून त्याची प्रकृतीही चिंताजनक आहे.

मिळालेली माहिती अशी, मयर सर्व नाशिक शहरातील राहाणार असल्याचे समजते. भडगाव येथे आपल्या भावाच्या वास्तुशांतीसाठी नाशिकहून वंदना संतोष ललवाडे (४०), शुभम संतोष ललवाडे (२०), निकिता मनोज शिंदे (२२)आणि तीन वर्षीय बालक नाशिकहून भडगाव येथे निघाली होते. वंदना ललवाडे या आपला भाऊ विश्वनाथ फकिरा पाटील यांच्याकडे वास्तुशांती असल्याने आपला मुलगा शुभम आणि विवाहित मुलगी निकीता आणि तीन वर्षीय नातू असे सर्वजण कार (क्र. एमएच/ १५ /सीडी/२०५७) ने भगडगा येथे सकाळी निघाले होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास नांदगाव-संभाजीनगर रस्त्यावर गंगाधरी गावाजवळील हॉटेल तेजस नजिक समोरील एका वाहनाला ओव्हरटेक करणारी चाळीसगाव -मनमाड बस (एमएच./१४/बी.टी/ ४४९८) ललवाडे यांच्या कारवार आदळली. बसने कारला समोरून दिलेल्या धडकेने कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला तर तीन वर्षीय बालक गंभीर जखमी झाले. त्यास मालेगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याचीही प्रकृती गंभीर असल्याचे समजते. हा अपघात इतका भीषण होता की अपघातात कारचा चक्काचुर झाला. अपघातात वंदना यांचा मुलगा संतोष आणि मोठी मुलगी निकिता यांचा मृत्यू झाला. एकाच कुटूंबातील तिघांवर काळाने झडप घातल्याने या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच सहा. पोलीस निरीक्षक सुनील बढे तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.



## नाशिकमध्ये वादळी पावसाने ५१३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान; पंचनाम्याचे आदेश



**नाशिक , प्रतिनिधी :**
जिल्ह्यात आठ ते ११ मे या कालावधीत वादळी वाऱ्यासह झालेल्या वळिवाच्या पावसाचा ४१ गावांतील ५१३ हेक्टरवरील पिके आणि फळबागांना फटका बसला. यात सर्वाधिक ४७५ हेक्टरवरील आंब्याचे नुकसान झाले आहे. नैसर्गिक संकटात १३३८ शेतकरी बाधित झाले. अनेक तालुक्यात घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. या नुकसानीचे पंचनाम्याचे आदेश प्रशासनाने दिले असले तरी बहुतांश कर्मचारी निवडणूक कामात असल्याने हे काम संथपणे पुढे सरकत आहे.

चार ते पाच दिवसांपासून अनेक भागात वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळत आहे. जिल्ह्यातील अनेक भागात घरांची पडझड झाली. वीज पडून चांदवड तालुक्यात एका महिलेचा मृत्यू झाला तर सिन्नरमध्ये घराची भिंत पडून महिला जखमी झाली. वीज पडून पशूधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी पावसाने हातातोंडाशी आलेला आंब्याचा घास हिरावला गेला. नुकसानीच्या प्राथमिक अहवालानुसार ४१ गावातील १३३८ शेतकरी बाधित झाले. या गावातील एकूण ५१३ हेक्टरवरील पिके आणि फळपिकांचे नुकसान झाले. डाळिंबाचे (साडेचार हेक्टर), द्राक्ष (१.२१ हेक्टर) यासह काही ठिकाणी मका व कांद्याचे नुकसान झाले. २४ हेक्टरवरील इतर पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. नैसर्गिक संकटाची सर्वाधिक झळ पेठ तालुक्यास बसली. या तालुक्यातील २९ गावांतील १२७० शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या एकाच तालुक्यात ४६९ हेक्टरवरील आंबा आणि २४ हेक्टरवरील अन्य पिके असे ४९३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. सुरगाणा आणि नाशिक तालुक्यात प्रत्येकी चार गावांना पावसाचा फटका बसला. नाशिकमध्ये (साडेसात हेक्टर), सुरगाणा (३.५१ हेक्टर), दिंडोरी (चार), सटाणा (३.८०) आणि निफाड (१.२१ हेक्टर) पिकांचे नुकसान झाले.

**निवडणुकीमुळे पंचनामे संथपणे**

जिल्ह्यात पावसामुळे जिवितहानी, पशूधन, फळपीक, कांदा चाळीचे मोठे नुकसान झाले. प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले असले तरी त्यास विलंब लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. २० मे रोजी नाशिक, दिंडोरी मतदारसंघात मतदान होणार आहे.

कृषी व महसूलसह अन्य विभागातील बहुतांश कर्मचाऱ्यांची निवडणूक कामावर नियुक्ती झाली आहे. निवडणूक प्रशिक्षण व अन्य कामांमुळे पंचनाम्याचे काम संथपणे पुढे जात आहे. पावसाची हजेरी कायम राहिल्यास नुकसानीचे प्रमाण वाढत राहील. यामुळे पुन्हा, पुन्हा ते काम करावे लागण्याची भीती व्यक्त केली जाते.

# तिहार तुरुंगाला बॉम्बने उडवण्याची धमकी, प्रशासनाने दिली दिल्ली पोलिसांना माहिती

**नवि दिल्ली , प्रतिनिधी:**
दिल्लीच्या तिहार तुरुंगाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. या संदर्भातील माहिती तिहार तुरुंग प्रशासनाने दिल्ली पोलिसांना दिली आहे. दिल्लीतील हॉस्पिटल, शाळा, जयपूरमधील शाळा आणि दिल्ली एअरपोर्टनंतर आता दिल्लीतील तिहार तुरुंगाला नव्याने मेलद्वारे बॉम्बने (ढहीशरीं ीं ढळहरी गरळश्र) उडवण्याची धमकी मिळाली आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिले आहे.

दिल्लीत बॉम्बच्या धमक्या मिळण्याचा सिलसिला थांबत नाही. आता दिल्लीच्या तिहार तुरुंग प्रशासनाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने तुरुंग प्रशासन आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी दिल्लीतील अनेक रुग्णालयांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. दरम्यान आज (दि.१४) दुपारी धमकी मिळताच तिहार तुरुंग प्रशासनाने दिल्ली पोलिसांना याची माहिती दिली आहे.

तिहार तुरुंग प्रशासन अधिकाऱ्यांनाही अज्ञात व्यक्तिकडून ईमेल (ढहीशरीं ीं ढळहरी गरळश्र) मिळाल्याचे समोर आले आहे. तिहार




प्रशासनाकडून याची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांकडून तिहार तुरुंग आणि परिसरात तपास सुरू केला आहे. परंतु कारागृह प्रशासन आणि दिल्ली पोलिसांनी केलेल्या तपासात काहीही संशयास्पद आढळले नाही, असेही दिल्ली पोलिसांनी माध्यमांना दिलेल्या माहितीत सांगितले आहे.

## भीमा कोरेगाव प्रकरणी गौतम नवलखा यांना जामीन मंजूर



**जयपूर :** २०१८ च्या भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा या कार्यकर्त्याला जामीन देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठवली आहे. त्यामुळे गौतम नवलखा यांना जामीन मंजूर करण्यात आला. न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि एसव्हीएन भाटी यांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्थगिती वाढवण्याचे टाळले. न्यायालयाने म्हटले आहे की, जामीन देण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश तपशीलवार असल्याने स्थगिती आणखी वाढवू नये, असा आमचा कल आहे. खटला पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागतील. त्यामुळे वादांवर तपशीलवार चर्चा केल्याशिवाय आम्ही स्थगिती वाढवणार नाही.नवलखा यांना जामीन मंजूर करणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या डिसेंबर २०२३ च्या आदेशाविरुद्ध एनआयएच्या अपीलावर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करत होते. एनआयएने एप्रिलमध्ये म्हटले होती की नवलखा यांनी एजन्सीला सुमारे १.६४ कोटी देणे बाकी आहे. गौतम नवलखा नजरकैद अटकेसाठी सुरक्षा खर्च देण्याच्या दायित्वातून सुटू शकणार नाही. नवलखा, जे मानवाधिकार कार्यकर्ते आहेत आणि पीपल्स युनियन फॉर डेमोक्रॅटिक राइट्स (झणऊ) चे माजी सचिव आहेत, त्यांना ऑगस्ट २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती. सुरुवातीला त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले असले तरी, नंतर त्यांना त्यांच्या घरी हलविण्यात आले. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांच्या वृद्धत्वाच्या कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका स्वीकारल्यानंतर त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले.

## 'पतंजली आयुर्वेद' विरुद्ध खटल्याचा निकाल सुप्रीम कोर्टाने ठेवला राखून



**नविदिल्ली :** पतंजली आयुर्वेदाच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीप्रकरणी जाहिराती प्रसिद्ध केल्याबद्दल पतंजली आयुर्वेद विरुद्धच्या अवमानाच्या खटल्याची सर्वोच्च न्यायालयात आज ( दि. १४) सुनावणी झाली. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने निकाल राखून ठेवला आहे. दरम्यान,आजच्या सुनावणीवेळी योगगुरू बाबा रामदेव न्यायालयात उपस्थित होते.

## दिल्ली-लखनौ महामार्गावर भरधाव कार दुभाजक ओलांडून ट्रकला धडकली; ६ जणांचा मृत्यू



**उत्तर प्रदेश :** उत्तर प्रदेशमध्ये दिल्ली-लखनौ राष्ट्रीय महामार्गावर भरधाव कार रस्ता दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकला धडकली. या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. सोमवारी (दि.१३) रात्री १२ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. गढ कोतवाली येथे मुरादाबादकडे जाणारी निळ्या रंगाची एक्सेल सिक्स कार सुमारे १५ फूट रुंद दुभाजक ओलांडून मुरादाबादहून दिल्लीच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकला धडकली. या धडकेत कारचा चक्काचूर झाला. ज्यामध्ये सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. रुग्णवाहिकेतून जखमींना गढ सीएससीमध्ये पाठवण्यात आले. अपघातानंतर मृतांच्या शरीरातून एवढा रक्तस्राव झाला होता की, रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता.

# राजीव गांधींची हत्या करणाऱ्या संघटनेवरील बंदी आणखी पाच वर्षांनी वाढवली; मोदी सरकारचा निर्णय

**नवि दिल्ली :**
माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येत सहभागी असलेल्या लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम (ङढढए) या संघटनेवरील बंदी आणखी पाच वर्षांनी वाढवण्यात आली आहे. ही संघटना लोकांमध्ये सतत फुटीरतावादी प्रवृत्तींना प्रोत्साहन देत आहे. आणि भारतात, विशेषतः तामिळनाडूमध्ये आपले हातपाय पसरत असल्याने ही बंदी घालण्यात आली आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा, १९६७ च्या कलम ३ मधील उपकलम (१) आणि (३) लागू करून ही बंदी लागू केली.




गृह मंत्रालयाने एका अधिसूचनेत म्हटले आहे की, केंद्र सरकारचे मत आहे की एलटीटीई अजूनही देशाच्या अखंडतेला आणि सुरक्षेला बाधक अशा कारवायांमध्ये गुंतलेली आहे.

त्यात म्हटले आहे की, मे २००९ मध्ये श्रीलंकेत लष्करी पराभव झाल्यानंतरही, एलटीटीईने 'इलम' (तमिळांसाठी स्वतंत्र देश) ही संकल्पना सोडलेली नाही आणि गुप्तपणे निधी उभारणी आणि प्रचार उपक्रम हाती घेऊन 'इलम' कारणासाठी काम करत आहेत. तसेच उरलेल्या ङढढए नेत्यांनी किंवा कॅडरने देखील विखुरलेल्या कार्यकर्त्यांचे पुनर्गठन करण्यासाठी आणि स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटनेचे पुनरुत्थान करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

एलटीटीई समर्थक गट जनतेमध्ये अलिप्ततावादी प्रवृत्ती वाढवत आहेत आणि भारतातील आणि विशेषतः तामिळनाडूमध्ये एलटीटीईसाठी समर्थन वाढवत आहेत, ज्याचा भारताच्या प्रादेशिक अखंडतेवर प्रभाव पडणार आहे, असे अधिसूचनेत म्हटले आहे.

# मोदींची मिमिक्री करणाऱ्या कॉमेडियन श्याम रंगिलाला उमेदवारी अर्जच मिळेना!



**नवी दिल्ली :**
कॉमेडियन श्याम रंगिला याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात वाराणसी येथून निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती. श्याम रंगिला याने सकाळी आपल्या सोशल मिडिया हँडलवर पोस्ट करून यासंदर्भात महत्त्वाची अपडेट दिली आहे. वाराणसी येथून त्याला अद्याप उमेदवारी अर्ज मिळू शकलेला नाही. त्याने सर्व प्रकारचे प्रयत्न करुन सुद्धा त्याला उमेदवारी अर्ज मिळत नसल्याची तक्रार त्याने केली आहे.

उत्तर प्रदेशातील वाराणसी येथून लोकसभा निवडणूक लढवण्याची श्याम रंगिलाने तयारी केली आहे. याच मतदारसंघातून पंतप्रधान मोदी तिसऱ्यांना लोकसभा लढवत आहेत. श्याम रंगिलाने दावा केलाय की, सर्व प्रयत्न करून सुद्धा त्याला उमेदवारी अर्ज देण्यात आला नाही. त्याने डीएम ऑफिसला फोन केला. रिटर्निंग ऑफिसरला फोन केला. पण, त्याला कोठूनही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. तो अद्याप उमेदवारी अर्जासाठी वाट पाहतोय.

एक्स सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवरील व्हिडिओत तो म्हणालाय की, 'मी सकाळपासून येथे पोहोचलो आहे. मी सगळी कागदपत्रं आणली आहेत. पण, त्यांनी माझा अर्ज स्वीकारला नाही. माझा किमान अर्ज तरी त्यांनी स्वीकारावा. त्यानंतर त्यांना वाटलं तर तो रद्द करावा.'

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, चिन्ह प्रकरणी सुनावणी '१६ जुलै'ला



**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**
निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह अजित पवारांना देण्यात आले. या निर्णयाला शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मंगळवारी (१४ मे) सुनावणी होणार होती. मात्र, ती होऊ शकली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता पुढील सुनावणी आता थेट '१६ जुलै'ला होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट निर्माण झाले. यानंतर दोन्ही गटांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचाच असल्याचा दावा केला. हा वाद पुढे निवडणूक आयोगात गेला. आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे घड्याळ चिन्ह हे अजित पवारांकडे देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या प्रकरणी आज (१४ मे) सुनावणी होणार होती. मात्र ती होऊ शकली नाही सर्वोच्च न्यायालयाला १८ मे पासून ७ जुलैपर्यंत उन्हाळी सुट्टी आहेत. त्यामुळे दरम्यानच्या काळात या प्रकरणावर सुनावणी होणे शक्य नाही पुढील सुनावणीसाठी न्यायालयाने १६ जुलै ही तारीख दिली आहे.

या प्रकरणात १९ मार्चला सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला नोटीस जारी केली होती आणि चार आठवड्यात त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगितले होते. ते अद्याप अजित पवार गटाने दाखल केलेले नाही. आणि त्यानंतर शरद पवार गटाला दोन आठवड्यात रिजॉईंडर दाखल करायचे होते. मात्र दोन्ही बाजूंनी अद्याप या गोष्टीची पूर्तता करण्यात आली नाही. यापुढे १६ जुलैला होणाऱ्या सुनावणीपूर्वी दोन्ही बाजूंना न्यायालयाने सांगितलेल्या बाबींची पूर्तता करावी लागणार आहे, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी दिली.

# विशेष ओळख असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिरेटोपावरुन नवा वाद; प्रफुल्ल पटेलांची कृती वादात

**वाराणसी :**
काल वाराणसी येथून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा देताना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी मोदी यांच्या डोक्यावर जिरेटोप चढवला होता. या घटनेमुळे आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेशी घट्ट बांधल्या गेलेल्या जिरेटोपाविषयी काही संकेतही दृढ आहेत. असे असताना मोदी यांना जिरेटोप घातल्याबद्दल शिवभक्तांमधून पटेल यांच्याविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाने याबाबत सारवासारव करताना यात मोदींचा दोष नाही असे म्हटले आहे. (झर्हों-छरीशपवीर चेवळ/द)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी वाराणसी येथून उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी एनडीएतील घटकपक्षांचे प्रमुख नेते तसेच भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रफुल पटेल यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

मोदी यांनी अर्ज दाखल केल्यानंतर या नेत्यांनी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी पटेल यांनी मोदी यांच्या डोक्यावर स्वहस्ते जिरेटोप चढवला. या प्रसंगाची चित्रफित समाजमाध्यमांवरून प्रसारित होताच महाराष्ट्रातून त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

# इराणशी सहकार्य करणाऱ्यांना फळं भोगावी लागतील! अमेरिकेची भारताला गर्भित धमकी

**नवि दिल्ली :**
सागरी व्यापार तसेच सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या इराणमधील चाबहार बंदराचे संचालन करण्यासाठी भारताने सोमवारी (दि. १४ मे) १० वर्षांच्या करारावर स्वाक्षरी केली. या बंदराच्या माध्यमातून भारताचा मध्य आशियाशी व्यापार वाढविण्यास मदत होणार आहे. तसेच चाबहारच्या माध्यमातून भारताने प्रथमच विदेशी बंदराचे व्यवस्थापन हाती घेतले आहे. मात्र अमेरिकेला भारताचा करार रुचलेला नाही. करार केल्यानंतर काही तासांतच अमेरिकेने इराणशी व्यवहार करणाऱ्यांना निर्बंधाच्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असा गर्भित इशारा दिला आहे.



इराणने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेने काही दिवसांपूर्वी इराणमधील मानवरहीत हवाई वाहनांच्या उत्पादनाला लक्ष्य केले होते. त्यानंतर अमेरिकेकडून इराणशी व्यवहार करणाऱ्यांना देशांना निर्बंधाची धमकी देण्यात येत आहे.

यूएस स्टेट डिपार्टमेंटचे प्रवक्ते वेदांत पटेल हे पत्रकार परिषदेला संबोधित करत असताना त्यांना या करारासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले, इराण आणि भारत यांच्यात झालेल्या चाबहार बंदराच्या कराराची माहिती आम्हाला मिळाली आहे. चाबहार बंदराचा करार आणि इराणशी द्वीपक्षीय संबंध याबाबत भारतानेच आपले परराष्ट्र धोरण जाहीर करावे, असे मी म्हणेण. अमेरिकेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास आम्ही इराणवर निर्बंध घातले आहेत आणि त्यावर यापुढेही ठाम राहू.

याचा अर्थ अमेरिका भारतावरही निर्बंध घालणार असा होतो का? असाही प्रश्न पटेल यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, तुम्ही आम्हाला हे अनेकदा बोलताना ऐकलं असेल की जे लोक इराणशी व्यापार करतील त्यांना निर्बंधासारख्या धोक्यांना तोंड द्यावे लागू शकते. इराणशी व्यापारी संबंध निर्माण करताना याची माहिती असणे इतर देशांसाठी आवश्यक आहे.

# मविआचे सरकार असताना उद्धव ठाकरे आणि नरेंद्र मोदी यांच्यात गुप्त बैठक झाल्याचा दावा; एकनाथ शिंदेचा खुलासा

**मुंबई, प्रतिनिधी :**
महाविकास आघाडीचे सरकार असताना उद्धव ठाकरे हे भाजपाबरोबर जाण्यास तयार होते आणि त्यासाठी उद्धव ठाकरे आणि पंतप्रधान मोदी यांच्यात बैठकही झाली होती, असा दावा सध्या महायुतीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. या दाव्यानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. दरम्यान, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. भाजपाबरोबर जाण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि उद्धव ठाकरे यांच्यात बैठक झाली होती. ही बाब खरी आहे, असे ते म्हणाले. एपीबी माझाच्या 'माझा महाराष्ट्र माझा व्हिजन' या कार्यक्रमात



ते बोलत होते.

**एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?**

पंतप्रधान मोदी यांच्याबरोबर दिल्लीत बैठक झाली, हे सर्वांना माहिती आहे. याशिवाय पंतप्रधान मोदी आणि उद्धव ठाकरे यांच्यात वैयक्तिक बैठक झाली होती. त्या बैठकीत भाजपाबरोबर जाण्याबाबत चर्चा झाली होती. या बैठकीचा तपशील मी आता सांगणार नाही. मात्र, ही बैठक झाली, हे खरं आहे. याचाच अर्थ उद्धव ठाकरेंनी आधी भाजपा आणि महायुतीला फसवलं, महाराष्ट्रातील जनतेला फसवलं, बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली आणि दुसऱ्यांना महाविकास आघाडीलाही फसवण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न होता, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकाही केली. भाजपा आणि महाविकास आघाडी या दोघांनाही फसवण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी केला. कारण त्यांना खुर्चीचा मोह सुटत नव्हता. त्यांनी विरोधातील १२ आमदारांना निलंबित केले. याशिवाय भाजपाच्या काही आमदारांना तुरुंगात टाकण्याचा आणि भाजपाचे २० ते २५ आमदार फोडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. हे सर्व माझ्या डोळ्यासमोर घडत होतं, असे ते म्हणाले.


**सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेलांनी काय म्हटलं होतं?**

दरम्यान, उद्धव ठाकरे हे भाजपाबरोबर जाण्यासाठी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली होती, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी केला होता. लोकसत्ताच्या 'लोकसंवाद' कार्यक्रमात बोलताना प्रफुल्ल पटेल यांनी याबाबत भाष्य केलं होतं. महाविकास आघाडीचे सरकार असताना उद्धव ठाकरे, अजित पवार आणि अशोक चव्हाण हे दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटायला गेले होते.

# ३४ हजार कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणी धीरज वाधवान यांना सीबीआयकडून अटक

**नवि दिल्ली :**
डीएचएफएलचे माजी संचालक धीरज वाधवान यांना सीबीआयने अटक केली आहे. त्यांच्यावर ३४ हजार कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणुकीचे आरोप आहेत. अटकेनंतर त्यांना आज दिल्लीतील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली.

'द फायनान्शियल एक्स्प्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, सोमवारी सायंकाळी धीरज वाधवानला यांना मुंबईतून ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर आज त्यांना दिल्लीतील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली. याप्रकरणी सीबीआयने २०२२ मध्येच



त्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. महत्त्वाचे म्हणजे येस बँक घोटाळ्याप्रकरणी त्यांना यापूर्वीही अटक करण्यात आली होती. मात्र, सध्या ते जामीनावर बाहेर होते.

सीबीआयने २०२२ मध्ये एकूण १७ बँकांची ३४ हजार कोटी रुपयांनी फसवणूक केल्याच्या आरोपाखाली त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता.

त्यांनी २०१० ते २०१८ दरम्यान डीएचएफएलला ४२ हजार ७८१ कोटी रुपयांच्या कर्ज सुविधा दिल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. कपिल वाधवान आणि धीरज वाधवान यांनी मिळून हेराफेरी केली आणि मे २०१९ पासून कर्जाचं पेमेंट डिफॉल्ट करून ३४ हजार ६१५ कोटी रुपयांची फसवणूक केली, असं सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात सांगण्यात आले होते.